दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
वैभव विवेक स्वामी
सपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३४६ सोमवार दि.२४ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-346 Monday, Dt.24 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# पीयूसी तपासणी महागणार!

## वाहनधारकांच्या खिशाला पुन्हा कात्री,दुचाकीच्या प्रदूषण तपासणीसाठी ५० ऐवजी ६० रुपये, चारचाकी व डिझेल वाहनांच्या शुल्कातही वाढ..!!

मुंबई प्रतिनिधी

वाहनधारकांच्या खिशाला आणखी झळ बसण्याची शक्यता असून प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) तपासणीच्या शुल्कात वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पीयूसी केंद्र चालक संघटनेच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्तालयाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी परिपत्रक क्रमांक ४६ जारी करून सुधारित प्रस्तावित दर जाहीर केले आहेत.

असे आहेत सुधारित प्रस्तावित दर

दुचाकी वाहन : ५० रुपयांवरून ६० रुपये

पेट्रोलवरील तीनचाकी वाहन : १०० रुपयांवरून १२० रुपये

पेट्रोल, सीएनजी, एलपीजीवर चालणारे चारचाकी वाहन : १२५ रुपयांवरून १५० रुपये

## परिवहन आयुक्तालयाचे सुधारित दरांचे परिपत्रक जारी, मनमानी शुल्क आकारल्यास कारवाई..?

डिझेलवर चालणारे वाहन : १५० रुपयांवरून १८० रुपये

पीयूसी केंद्र चालकांकडून प्रदूषण तपासणी शुल्कात वाढ करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार शासनाने समितीमार्फत बाबींचा अभ्यास करून पुढील कार्यवाही केली आहे. संबंधित न्यायालयीन आदेश व शासनाच्या निर्देशांचाही विचार करण्यात आल्याचे परिपत्रकात नमूद आहे.

नवीन दरांबाबत वाहनधारकांना स्पष्ट माहिती मिळावी यासाठी सुधारित दर केंद्राच्या दर्शनी भागात ठळकपणे लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच निश्चित दरापेक्षा अधिक शुल्क आकारले जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश परिवहन विभागाने दिले आहेत.




मनमानी शुल्क आकारल्यास कारवाई

वाहनधारकांकडून निर्धारित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारल्याचे आढळल्यास संबंधित पीयूसी केंद्रावर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे दरवाढीची झळ वाहनधारकांना बसणार असली तरी पीयूसी केंद्र चालकांनी मनमानी शुल्क आकारू नये, असा स्पष्ट इशारा परिवहन विभागाने दिला आहे.

परिवहन आयुक्त राजेश नाईककर यांच्या स्वाक्षरीने हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. त्यामुळे आता राज्यातील वाहनधारकांचे लक्ष या प्रस्तावित शुल्कवाढीच्या अंमलबजावणीकडे लागले आहे.

---

## दहिफळ वडमाऊली येथे काल्याच्या कीर्तनाने नामसप्ताहाची उत्साहात सांगता




'राम कृष्ण हरी' नामजपाचा महिमा पुराणातही वर्णिला - ह.भ.प. अर्जुन महाराज लाड

बीड प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथे ह.भ.प. व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड राम

पान २ वर...

## प्रा.पी.टी.चव्हाण यांची भाजपा भटके विमुक्त प्रकोष्ठच्या प्रदेश सह- संयोजक पदी नियुक्ती



### तांडावाडी वस्तीवर आनंदोत्सव

बीड प्रतिनिधी

भाजपचे ज्येष्ठ नेते, राष्ट्रीय बंजारा महासंघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा.पी.टी.चव्हाण यांची भारतीय जनता पार्टीच्या भटके मुक्त प्रकोष्ठच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी मध्ये सह-संयोजक म्हणून सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे.

मागील पस्तीस वर्षांपासून बंजारा, भटके विमुक्त व ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी केलेल्या प्रदीर्घ संघर्षाची तसेच भाजपाच्या संघटनात्मक कार्याची व पक्षनिष्ठेची दाखल घेत राज्याचे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री तथा आमदार रवींद्र दादा चव्हाण, पर्यावरण व पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई साहेब मुंडे,भाजपा भटके विमुक्त प्रकोष्ठचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र दादा पवार, प्रदेश महामंत्री तथा प्रभारी राजेशजी पांडे यांच्या नेतृत्वाखाली व शिफारशीने प्रा,पी.टी. चव्हाण यांची

पान २ वर...

## दैनिक समर्थ राजयोगच्या वर्धापन दिनानिमित्त...

### हेलन केलर राज्यस्तरीय दिव्यांग आदर्श संस्था चालक सेवा गौरव पुरस्कार श्रीमती मीना देवडकर, दिनकर गुणाले, दशरथ शिंदे यांना जाहीर...!.

बीड प्रतिनिधी

दिव्यांग सेवेची दखल घेऊन दैनिक समर्थ राजयोगच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय हेलन केलर दिव्यांग आदर्श संस्थाचालक सेवा गौरव पुरस्कार २०२६ हा श्रीमती मीना देवडकर, दशरथ शिंदे आणि दिनकर गुणाले सर यांना जाहीर करण्यात आला आहे.

दैनिक समर्थ राजयोग आपल्या वर्धापन दिनानिमित्त मागील सहा वर्षांपासून शिक्षक दिनाचे औचित्य साधत दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षण क्षेत्रातील दुर्लक्षित वंचित असलेल्या



घटकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करत आहे. यावर्षी बीड जिल्ह्यातील दिव्यांग संस्था, संस्थेतील आदर्श शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच दिव्यांगांची प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.


यावर्षी हेलन केलर राज्यस्तरीय दिव्यांग आदर्श संस्थाचालक सेवा गौरव पुरस्कार २०२६ करिता ग्रामीण विकास महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाथापूरच्या सचिव श्रीमती मीना देवडकर तसेच लालबहादूर

पान २ वर...

---

# गणेशोत्सवात कायदा हातात घेतलात तर थेट हद्दपारी!

## कोल्हापूर पोलिसांचा 'ॲक्शन मोड', साऊंड-लाईट ऑपरेटरसह सराईत गुन्हेगार रडारवर



कोल्हापुरात साऊंड-लाईट ऑपरेटरवर पोलिसांचा वॉच. गुन्हा दाखल झाल्यास हद्दपारीची कारवाई

गणेश आगमन-विसर्जन मिरवणुकांसाठी कडेकोट बंदोबस्त, १४ मुद्द्यांची नियमावली जाहीर

कोल्हापूर । सनी लोंढे स्पेशल रिपोर्ट

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कंबर कसली असून, उत्सवाच्या नावाखाली धिंगाणा घालणारे सराईत गुन्हेगार तसेच साऊंड-लाईट ऑपरेटर पोलिसांच्या रडारवर आले आहेत. मागील पाच वर्षांतील गंभीर गुन्ह्यांची पार्श्वभूमी असलेल्या साऊंड-लाईट ऑपरेटरची माहिती संकलित करण्यात आली असून, उत्सव काळात पुन्हा गंभीर गुन्हा दाखल झाल्यास कठोर प्रतिबंधात्मक कारवाईसह हद्दपारीचा प्रस्तावही पुढे केला जाणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या गुन्हे आढावा बैठकीत गणेशोत्सवाच्या सुरक्षेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी कायदा व सुव्यवस्था, गणेश मंडळांची सुरक्षा, आगमन-विसर्जन मिरवणुका, ध्वनिप्रदूषण आणि सराईत गुन्हेगारांवरील प्रतिबंधात्मक कारवाई संदर्भात १४ मुद्द्यांची नियमावली जाहीर करण्यात आली.

मिरवणुकांवर ड्रोनची नजर

गणेश आगमन व विसर्जन मिरवणुकांमध्ये संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पोलिसांकडून ड्रोन, ध्वनीमापक यंत्र, मिक्सर, लेझर व धूरनिर्मिती यंत्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, ध्वनिप्रदूषण आणि गर्दीमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांना आळा घालण्यासाठी विशेष पथके कार्यरत राहणार आहेत.

साऊंड-लाईट ऑपरेटरची माहिती पोलिसांकडे

उत्सवात साऊंड सिस्टीमचा गैरवापर करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. मागील पाच वर्षांत गंभीर गुन्हे दाखल असलेल्या ऑपरेटरची माहिती संकलित करण्यात येत आहे. पुन्हा गंभीर गुन्ह्यात सहभाग आढळल्यास प्रतिबंधात्मक कारवाईसह हद्दपारीची कारवाई केली जाऊ शकते.

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२६
प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती
स.न.वि.वि.
मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ७ वा वर्धापन दिन शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२६' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.
आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

दिनदर्शिका-२०२७ जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/- |
| २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/- |
| ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/- |
| ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/- |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.
प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड
महोदय,
वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............/- रोख/चेक/डी.डी./ऑनलाईन जमा करत आहे.
जाहिरातदाराचे नाव :
गाव : तालुका : जिल्हा :
मो.नं. :
₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :-
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com
जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
बँक खाते :
दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

७ व्या वर्धापन दिनानिमित्त
दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६
गौरव समर्पणाचा ! सन्मान ज्ञानदानाचा !!
सहभागाकरीता नम्र आवाहन
प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख
गुरुवार, २० ऑगस्ट २०२६
शिक्षण क्षेत्रातील समर्पण, अमूल्य योगदान आणि विशेष शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी 'दैनिक समर्थ राजयोग' च्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.यावर्षी विशेष प्राधान्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षक/कर्मचारी व दिव्यांग संस्थाचालक यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील आपल्या विशेष कर्तृत्वाने आदर्शाचा वस्तुपाठ घालणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तरी आपण आपल्या विशेष व कौतुकास्पद कामाचा संक्षिप्त अहवाल (पुराव्यांसह/छायाचित्रांसह) पाठवावा ही विनंती.
वैभव जगदेवी विवेक स्वामी
- संपादक




पुरस्कारासाठी पात्र निकष व वर्गवारी
1. दिव्यांग शाळा व संस्था :
दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य करणारे संस्थाचालक.
निकष:
दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी, शिक्षणासाठी व आत्मविश्वासासाठी केलेले विशेष व कौतुकास्पद कार्य.
2. सामान्य शाळा वर्गवारी:
जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक.
निकष:
गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमशीलता, सामाजिक सहभाग आणि उत्कृष्ट कार्यकाळ.
प्रस्तावासोबत जोडायची माहिती:
पूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत असलेली संस्था/शाळा व पद, शैक्षणिक कार्यकाळात केलेले कार्य.
आपले प्रस्ताव पाठवण्यासाठी: ईमेल: vaibhav11swami@gmail.com व्हॉट्सॲप / संपर्क: 9822628521
कार्यालयाचा पत्ता: दैनिक समर्थ राजयोग कार्यालय, सम्राट चौक, शाहुनगर कॉर्नर, बीड - ४३११२२

## संपादकीय....

# ज्ञानाग्राही समाजाच्या नवनिर्मितीसाठी...

आजच्या अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जगात आपला समाज बुद्धीविहीन माहितीचे आदान-प्रदान करीत असतो. त्यामुळेच माहितीचे आदान-प्रदान करताना विवेकी ज्ञानाचा आग्रह धरणाऱ्या समाजाच्या नवनिर्मितीचे आव्हान आपल्याला पेलावे लागणार आहे.

आजच्या अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जगात आपला समाज बुद्धीविहीन माहितीचे आदान-प्रदान करीत असतो. त्यामुळेच माहितीचे आदान-प्रदान करताना विवेकी ज्ञानाचा आग्रह धरणाऱ्या समाजाच्या नवनिर्मितीचे आव्हान आपल्याला पेलावे लागणार आहे.

समाजजीवन हे मुख्यत्वेकरून अनुकरणावर अवलंबून असते. क्वचित एखादी अलौकिक व्यक्ती नवनिर्मिती करून एखादा नवा विचार, नवा आचार, नवा संप्रदाय, नवी वर्तनपद्धती शोधून काढते. मग या गोष्टी अनुकरणाने समाजात प्रसृत होतात आणि समाजजीवनात समान आचारविचार दृढमूल होऊन सारखेपणा आणि सुरळीतपणा येतो. या नवनिर्मितीमुळे प्रगती होते, तर अनुकरणामुळे समाजाला स्थैर्य प्राप्त होते. परंतु या नवनिर्मितीचा प्रसार होऊ लागला, की तिचा रूढ आचार-विचारांशी संघर्ष होतो आणि या संघर्षाची समाप्ती अखेर समन्वयात होते. समन्वय हाही एक प्रकारची नवनिर्मितीच असते. तिचाही सर्वत्र प्रसार होऊ लागला, की पुन्हा नवा संघर्ष निर्माण होतो आणि पुनश्च नवीन समन्वय घडून येतो. हा चक्रनेमिक्रम सतत चालू राहतो. असे गाब्रिएल तार्द (१८४३-१९०४) या नामवंत फ्रेंच सामाजिक विचारवंताने लिहून ठेवले. नावीन्याचा शोध ही प्राचीन काळापासून तर आजच्या अत्याधुनिक काळापर्यंत चालणारी एक निरंतर प्रक्रिया आहे. 'बुद्धी किंवा विषयाचे आकलन करण्याचे सामर्थ्य म्हणजे ज्ञान' असा अर्थ 'महाराष्ट्र शब्दकोश' (दाते, कर्वे)मध्ये दिलेला आहे, तर सुसंघटित माहिती म्हणजे ज्ञान किंवा सुसंघटित माहिती प्राप्त केल्यावर होणारा समज किंवा जाणीव म्हणजे ज्ञान (रँडम हाऊस डिक्शनरी ऑफ दि इंग्लिश लँग्वेज) असा अर्थ दिलेला आहे. 'वैज्ञानिक पद्धती म्हणजे यथार्थ ज्ञान संपादन करण्यासाठी अनुसरावयाची व्यवस्थित व कार्यक्षम रीती होय' (डायमंड सामाजिक ज्ञानकोश २००७) या व्याख्येत 'यथार्थ ज्ञान' असा शब्द वापरण्यात आला आहे.

ख्रिस्तपूर्व ३०० मध्ये रिस्टॉटलने लॉजिक (तर्कशास्त्रा)चा पाया घातला. कोणत्याही विचारामागे यथायोग्य तर्क हाच पाया असतो. तर्काशिवाय ज्ञान किंवा साधी माहितीही अपूर्ण असेल. निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रचिती यांची सुसंगती लावली की ज्ञानाकडे प्रवास सुरू होतो. ज्ञान म्हणजे केवळ माहितीची साठवणूक नव्हे, विश्लेषण करण्याची आणि जगाकडे पाहण्याची एक स्वतंत्र प्रतिभा होय. गोपाळ गणेश आगरकर यांनी म्हटलेलं आहे की, नुसतं ज्ञान वाढून फायदा नाही त्याप्रमाणे वागण्याचे धैर्य यायला पाहिजे. ज्ञान हा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

पान १ वरून..

**दैनिक समर्थ राजयोगच्या ....**

शास्त्री शिक्षण प्रसारक मंडळ गित्ता तालुका अंबाजोगाई या संस्थेचे अध्यक्ष दशरथ शिंदे सर आणि सौ. सुमतीबाई गुणाले शिक्षण प्रसारक मंडळ धानोरा तालुका अंबाजोगाई या संस्थेचे सचिव दिनकर तुळशीराम गुणाले हे मानकरी ठरले आहेत.

बीड तालुक्यातील नाथापूर येथे ग्रामीण विकास महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची दिव्यांगासाठी सुसज्ज इमारत असून अद्यावत सुविधेसह साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय कार्यरत आहे. या शाळेमध्ये शंभर टक्के विद्यार्थी प्रवेशित असून मतिमंद प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे दिशा अभियान हे बीड जिल्ह्यामध्ये अव्वल ठरले आहे. संस्थेची संघटनात्मक बांधणी ही गोरगरीब दिव्यांगांना मदत करण्यासाठी, त्यांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याकरता आदर्शवत आहे. याकरिता या संस्थेच्या सचिव मीना देवडकर या राज्यस्तरीय पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत.

लालबहादूर शास्त्री प्रसारक मंडळ गित्ता तालुका अंबाजोगाई या संस्थेची मूकबधिर प्रवर्गासाठी दहावीपर्यंत गित्ता तालुका अंबाजोगाई या ठिकाणी दिव्यांग शाळा आहे. निसर्गरम्य वातावरणासह विद्यार्थ्यांना विद्या दानाचे होत असलेले कार्य आदर्शवत आहे. याची दखल घेऊन या संस्थेचे अध्यक्ष दशरथ शिंदे सर पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

सौ सुमतीबाई गुणाले शिक्षण प्रसारक मंडळाची शेतकी पुनर्वसन केंद्र धानोरा तालुका अंबाजोगाई येथे दिव्यांग कार्यशाळा कार्यरत आहे. या शाळेमध्ये शेती करणे, वृक्ष लागवड करणे, त्यांचे संगोपन करणे, मेणबत्ती तयार करणे, झाडू तयार करणे, फिनेल तयार करणे असे व्यवसायभिमुख शिक्षण दिले जाते, जे आदर्शवत आहे. त्याची दखल घेऊन या संस्थेचे सचिव दिनकर तुळशीराम गुणाले हे यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी स्मृतिचिन्ह, सेवा गौरव प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, झाड भेट देऊन फेटा बांधून सर्वांच्या उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि कार्यकारी संपादक शेख आयेशा यांनी दिली आहे.

**गणेशोत्सवात कायदा ....**

सराईत गुन्हेगारांना पोलिसांचा इशारा

गणेशोत्सवात शांतता भंग करू शकणाऱ्या सराईत गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली असून, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे. आवश्यकतेनुसार हद्दपारीचे प्रस्तावही दाखल केले जाणार असल्याने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांनी कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

गणेश मंडपांनाही सुरक्षा नियम बंधनकारक

गणेश मंडपामुळे वाहतुकीला अडथळा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मंडपासाठी स्थानिक प्रशासन व शहर वाहतूक नियंत्रण शाखेची आवश्यक परवानगी घेणे, तसेच सीसीटीव्ही आणि अग्निशमन यंत्रणा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

'गणराया पुरस्कार'ने विधायक मंडळांचा गौरव

पारंपरिक वाद्यांचा वापर, पर्यावरणपूरक उपक्रम, सामाजिक संदेश आणि विधायक कार्य करणाऱ्या गणेश मंडळांना 'गणराया पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळांच्या सुरक्षेसाठी 'गणपती मंडळ दत्तक योजना' राबविण्यात येणार आहे.

पान १ वरून..

गणेशोत्सव हा भक्ती, आनंद आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. मात्र उत्सवाच्या नावाखाली कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नाही. साऊंड-लाईट ऑपरेटर असो वा सराईत गुन्हेगार-कायदा मोडल्यास पोलिसांचा थेट 'ॲक्शन मोड' सुरू होणार आहे.

२७ सप्टेंबरला साऊंड-लाईट ऑपरेटरची बैठक...

साऊंड-लाईट ऑपरेटरना गणेशोत्सवातील नियमांची माहिती देण्यासाठी २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. ध्वनिप्रदूषण, मिरवणुकीचे नियम आणि कायदा व सुव्यवस्थेबाबत यावेळी मार्गदर्शन केले जाणार आहे.

**प्रा.पी.टी.चव्हाण यांची....**

भाजपच्या भटके विमुक्त प्रकोष्ठच्या प्रदेश सह-संयोजक पदी सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा भटके विमुक्त प्रकोष्ठच्या कार्यकारिणीत राजू साळुंके रायगड, शिवाजी आव्हाड ठाणे, युवराज मोहिते नाशिक, तुषार पोटे अहिल्यानगर,संगीता खोत सांगली यांना देखील सह संयोजक पदावर संधी मिळाली आहे.

या नियुक्तीमुळे बंजारा भटके मुक्तांच्या तांडा वाडी वस्ती व पालावर आनंदोत्सव साजरा करण्यात येत असून सर्वत्र या नियुक्तीचे स्वागत करण्यात येत आहे.

प्रा.पी.टी.चव्हाण यांच्या सामाजिक व संघर्षशिल जीवनाच्या प्रदीर्घ अनुभवाचा व संघटनात्मक कौशल्याचा भारतीय जनता पार्टीच्या विस्तार करण्यासाठी नक्कीच फायदा होईल असा विश्वास या निमित्ताने व्यक्त केला जात आहे. भाजपा पक्षातील प्रा.पी.टी.चव्हाण यांच्या राज्यस्तरावरील या नियुक्तीमुळे बंजारा धनगर वंजारी वडार कैकाडी तिरमली टकारी वैदू गोपाळ नंदीबैलवाले कुडमुडे जोशी इत्यादी समाजातील प्रमुख कार्यकर्ते तसेच बीड जिल्ह्यातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी यांनी प्रा.पी.टी चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे. प्रदेश सह संयोजक पदावर नियुक्ती करून एका बंजारा तांड्यावरील कार्यकर्त्याला भाजपा सारख्या सर्वात मोठ्या राजकीय पक्षात राज्यस्तरावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय व राज्यस्तरावरील वरिष्ठ नेतृत्वाचे प्रा.पी.टी. चव्हाण यांनी मनःपूर्वक आभार मानले आहे.

**दहिफळ वडमाऊली ....**

कृष्ण हरी नामजप सप्ताहाची शनिवारी काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. महाराजांचे गावात आगमन होताच तोफांची सलामी देत ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी 'हरिनामाचा खिचडी काला' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर ह.भ.प. अर्जुन महाराज लाड यांनी कीर्तन केले. भगवंताची भक्ती करण्यासाठी अनेक मार्ग आहेत मात्र सर्वांना सहज साध्य होणारा मार्ग म्हणजे राम कृष्ण हरी नामजप. या नामजपाचा महिमा पुराणांमध्येही वर्णिला आहे, असे त्यांनी सांगितले.

नामजपाच्या सामर्थ्यामुळे ३५ अपघात आणि पाच वेळा आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यातूनही मी सहीसलामत बाहेर पडलो. उर्वरित आयुष्य समाजसेवा आणि सत्कार्यासाठी अर्पण करणार, असा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

लाड गुरुजी यांनी आतापर्यंत ४५० गावांमध्ये राम कृष्ण हरी नामजपाचे सप्ताह सुरू केले आहेत. वडमाऊली येथील भक्ती, उत्साह आणि ग्रामस्थांच्या प्रेमाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी डोईफोडवाडी, सानपवाडी, निवडुंगवाडी, लिंबाचीवाडी, पिराचीवाडी, आंधळेवाडी, देवगाव, जोला ससुरा, खर्डेवाडी, तांदळाचीवाडी, विडा, पिंपळगाव तसेच परिसरातील महिला, पुरुष, तरुणाई आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह चार हजारांहून अधिक भाविक उपस्थित होते.अशी माहिती प्रा. तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली.

# संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर

### थायरॉईड नोड्यूल गर्भाशयातील गाठी व व्हेरिकोज व्हेन्सबाबत जनजागृती नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



जालना शेख फारुक :- थायरॉईड नोड्यूल गर्भाशयातील गाठी तसेच व्हेरिकोज व्हेन्ससारख्या आजारांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासह त्यांच्या आरोग्य तपासणीसाठी संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जालना यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन हॉस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर डॉ. बालिराम जी.बागल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी डॉ.शिवदास जी. मिरकड यांच्यासह हॉस्पिटलमधील डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फीट कापून शिबिराचे उद्घाटन झाले.

शिबिरामध्ये इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ.प्रणव बंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आजारांची तपासणी करण्यात आली.तसेच रुग्णांना तज्ज्ञांकडून आवश्यक वैद्यकीय सल्ला व उपचाराबाबत मार्गदर्शन देण्यात आले.थायरॉईड नोड्यूलसाठी आधुनिक उपचार पद्धती गर्भाशयातील गाठींसाठी कमी त्रासदायक व आधुनिक उपचार पद्धती तसेच व्हेरिकोज व्हेन्ससंदर्भात तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले.

पायांच्या शिरा फुगणे,पायात वेदना किंवा जडपणा जाणवणे,सूज येणे,खाज येणे अथवा त्वचेचा रंग बदलणे यांसारखी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी दुर्लक्ष न करता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि योग्य वेळी उपचार करून घ्यावेत असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

आरोग्यविषयक आजारांचे वेळीच निदान व योग्य उपचार याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना तज्ज्ञांचा सल्ला आणि आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध झाली.संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

# महाराष्ट्राच्या ढोल-ताशाला जागतिक नामांकन, २५ हजार युवकांच्या उपस्थितीत विश्वविक्रम

### इंडिया बुक व एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत 'मंथन फॉर युवा'चा दिमाखदार सोहळा



नागपूर प्रतिनिधी

महाराष्ट्राची पारंपरिक ओळख असलेल्या ढोल-ताशा पथकाने इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद करत जागतिक विक्रम प्रस्थापित केला. रेशीमबाग मैदानावर आयोजित 'मंथन फॉर युवा' उपक्रमात २५ हजारांहून अधिक युवक-युवती सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

या विक्रमात आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांचा सहभाग होता. यापूर्वीचा २६० ध्वजधारकांचा विक्रम मोडीत काढल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी संपूर्ण पथकाचे अभिनंदन केले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी युवकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासोबतच शिक्षण, कौशल्य, क्रीडा आणि स्टार्टअप क्षेत्रातील सहभाग वाढविण्यास शासन प्राधान्य देत असल्याचे सांगितले. स्टार्टअपसाठी युवकांशी चर्चा करून आणखी प्रभावी धोरण तयार करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच युवकांचा स्क्रीन टाईम कमी करून त्यांना मैदानाकडे वळविण्यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने धोरण आखले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुप्रसिद्ध क्रीडा समालोचक रिधिमा पाठक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह क्रिकेटपटू तिलक वर्मा, राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते दिलीप महादू गावित, अर्जुन देशपांडे आणि किरण शहाजी यांच्याशी संवाद साधला.

कार्यक्रमात विविध क्षेत्रातील युवकांचा गौरव करण्यात आला. १ ते २३ ऑगस्टदरम्यान राबविण्यात आलेल्या उपक्रमातील विजेत्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत युवकांना अमली पदार्थांपासून दूर राहण्याची शपथ पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी दिली. प्रारंभी आयोजक रितेश गावंडे यांनी स्वागत केले, तर विष्णू चांगदेव यांनी आभार मानले.




# विद्यार्थ्यांच्या दंत आरोग्यासाठी मोफत तपासणी शिबिर

बीड प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ बीड व बियाणी मल्टिस्पेशालिटी डेंटल क्लीनिक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा, नाथापूर व जवळा माध्यमिक विद्यालय, जवळा येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर घेण्यात आले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष सीए श्रीगोपाल लड्डा, सुहास बेदरे, प्रकल्पप्रमुख जीवन डोळस, उदय मुसळे, प्रकल्प समन्वयक प्रमोद निनाळ, प्रा. अभय पटवारी, डॉ. रमण बियाणी, डॉ. श्वेता टेकवाणी व डॉ. स्वाती गुट्टे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांना दातांची स्वच्छता व मौखिक आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.




## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत माजलगावचा जयसिंग तौर चमकला, सुवर्णपदकावर कोरले नाव

माजलगाव (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशीपमध्ये माजलगावच्या जयसिंग तौर याने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. कठोर मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक मिळवला.

ॲड. प्रमोद तौर यांचा मुलगा असलेल्या जयसिंगच्या यशाबद्दल प्रशिक्षक चंद्रमणी डोंगरे सर, माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके, जयसिंग भैय्या सोळंके, ॲड. भानुदासराव डक, ॲड. इंद्रजित शिंदे, नितीन जाधव, क्षितीज गायकवाड आदींनी अभिनंदन केले.

# महसूल मंत्र्यांच्या आदेशानंतरही कारवाईला 'ब्रेक'

### चौकशी अहवालानंतरही जिल्हा प्रशासनाची टाळाटाळ ?

**बहिरेगाव भूसंपादन प्रकरणात फेरफार रद्द करून जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे करण्याची शिफारस**

जालना / घनसावंगी

घनसावंगी तालुक्यातील बहिरेगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भूसंपादित जमिनीतील कथित अनियमिततेप्रकरणी महसूल मंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर अंबडचे उपविभागीय अधिकारी यांनी चौकशी पूर्ण करून जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर केला आहे. मात्र, अहवाल सादर होऊनही संबंधित फेरफार रद्द करून दोषींवर कारवाई करण्यास जिल्हा प्रशासनाकडून विलंब होत असल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात येत आहे.

बहिरेगाव येथील गट क्रमांक ११९ मधील एक हेक्टर १२ आर क्षेत्रापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यासाठी ६३ आर जमीन संपादित केली होती. उर्वरित ४३ आर जमीन मूळ खातेदार चत्रभुज वाहुळे यांनी लालासाहेब आदंड यांना विकली. त्यामुळे वाहुळे यांचे नाव सातबारावरून नियमानुसार कमी झाले होते.

मात्र, तत्कालीन तहसीलदारांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५५चा वापर करून, कोणतीही रीतसर सुनावणी न घेता भूसंपादित क्षेत्र कमी दाखवले आणि वाहुळे यांच्या नावे पुन्हा ५६ आर क्षेत्राची नोंद फेरफार क्रमांक ७३५ द्वारे केल्याचा आरोप आहे. पुढे या जमिनीचे हस्तांतरण जय महेश महिला नागरी पतसंस्था, अंबड यांच्या नावे करण्यात आले. तसेच १९ सप्टेंबर २०२४ रोजी अकृषिक परवानगी मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारदार बाबासाहेब बन्शी हेमके यांच्या तक्रारीनंतर झालेल्या चौकशीत भूसंपादित क्षेत्र कमी करण्याचा अधिकार तहसीलदारांना नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित फेरफार रद्द करून जमीन पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे नोंदविण्याची शिफारस चौकशी अहवालात करण्यात आल्याचे सांगण्यात येते.

महसूल मंत्र्यांचे आदेश आणि चौकशी अहवाल स्पष्ट असतानाही कारवाईला विलंब का, असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून शासकीय जमीन पूर्ववत करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

आदेश, सुनावणी अन् अहवाल तरीही कारवाईला विलंब का?

महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी असीमा मित्तल यांना स्वतः सुनावणी घेण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांना तात्काळ अहवाल सादर करण्याचे लेखी निर्देश दिले.

दरम्यान, तत्कालीन तलाठी आणि तक्रारदारांची सुनावणी घेऊन ११ ऑगस्ट रोजी सविस्तर व स्पष्ट अहवाल सादर करण्यात आला. मात्र, अहवाल सादर होऊनही अद्याप प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याने तक्रारदाराने नाराजी व्यक्त केली आहे.

अनियमितता करणारे अधिकारी आणि संबंधित भूखंड माफियांना पाठीशी घालण्यासाठी प्रशासनाकडून धडपड सुरू असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणाकडे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी असीमा मित्तल यांनी तातडीने लक्ष घालून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

घनसावंगी तालुक्यातील बहिरेगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भूसंपादित जमिनीतील कथित अनियमिततेप्रकरणी महसूल मंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर अंबडचे उपविभागीय अधिकारी यांनी चौकशी पूर्ण करून जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर केला आहे.

# भोकरदनमध्ये तुतारीचा रणशिंग फुंकले

## गद्दारांना थारा नाही निष्ठावंतांच्या पाठीशी पक्षाची ढाल ड.संजय काळबांडे यांचा सज्जड इशारा

भोकरदन इसरारखान पठाण :-

तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागले असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रणशिंग फुंकले आहे. माजी आमदार चंद्रकांत अण्णा दानवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आढावा बैठकीत कार्यकर्त्यांमध्ये जोश भरत पंचायत समितीवर तुतारीचाच झेंडा फडकवणार असा निर्धार करण्यात आला. पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना माफी नाही तर निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या पाठीशी पक्षाची संपूर्ण ताकद उभी राहील असा थेट इशारा नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष ड.संजय काळबांडे यांनी दिला.माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या या बैठकीला पदाधिकारी कार्यकर्ते आणि बीएलएंची मोठी उपस्थिती होती. आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गावागावात संघटन मजबूत करण्याची रणनीती यावेळी आखण्यात आली.गद्दारांना आता पक्षात जागा नाही नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष ड.संजय काळबांडे यांनी आपल्या भाषणातून पक्षातील बंडखोर आणि पक्षविरोधी कारवाया करणाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले. पक्षासाठी रक्ताचे पाणी करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना एकटे सोडले जाणार नाही. त्यांच्या पाठीशी पक्षाची ताकद खंबीरपणे उभी राहील. मात्र पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना कोणतीही माफी अथवा थारा दिला जाणार नाही असा सज्जड इशारा त्यांनी दिला.

काळबांडे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे बैठकीतील वातावरण अधिकच तापले. कार्यकर्त्यांनी घोषणांनी परिसर दणाणून सोडत पक्षाच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला.तुतारी चा आवाज गावागावात पोहोचवा

माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांची ताकद हीच पक्षाची खरी संपत्ती आहे. या ताकदीच्या जोरावर जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुका लढवू.भोकरदन पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचाच झेंडा फडकविण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने मैदानात उतरावे असा एल्गार त्यांनी केला.

११ जि.प.२२ पं.स. अन् ९१ ग्रामपंचायतींसाठी मोर्चेबांधणी युवानेते सुधाकर दानवे यांनी आगामी ११ जिल्हा परिषद २२ पंचायत समिती आणि ९१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी पक्षाने आत्तापासूनच कंबर कसल्याचे स्पष्ट केले. गाव वाडी-वस्ती आणि प्रत्येक बूथपर्यंत पोहोचून मतदारांशी संपर्क वाढविण्याचे आवाहन त्यांनीकेले.एसआयआरअंतर्गत मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण प्रारूप मतदार यादीतील नावे दावे-हरकती आणि बूथनिहाय मतदारांची तपासणी याबाबत बीएलएंना मार्गदर्शन करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरही आक्रमक भूमिका

विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुशील बोर्डे यांनी विद्यार्थ्यांचे तालुका ते राज्य पातळीपर्यंत मजबूत संघटन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रश्नांवर विद्यार्थी आघाडी आक्रमकपणे आवाज उठवेल असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रदेश सरचिटणीस पंकज नाना बोराडे यांनी भोकरदन-जाफराबाद मतदारसंघात माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रभावी विरोधी पक्षाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले.



जिल्हा पक्षनिरीक्षक मुस्ताक अहमद आणि युवक तालुकाध्यक्ष प्रा. डॉ. अंकुश जाधव यांनी प्रास्ताविक केले. तालुकाध्यक्ष रमेशशेठ सपकाळ यांनी कार्यकर्त्यांनी मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने मैदानात उतरावे, असे आवाहन केले.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार बैठकीदरम्यान नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष ड.संजय काळबांडे, विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुशील बोर्डे आणि जिल्हा पक्षनिरीक्षक मुस्ताक अहमद यांचा माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. विजय सुरासे, पंकज नाना बोराडे,सुधाकर अण्णा दानवे,रमेशशेठ सपकाळ, प्रा.अंकुश जाधव यांच्यासह सुभाष जगताप, आशिष पवार,सय्यद खलील, आयुब खान,शफिक शेठ पठाण, वसीमबेग मिर्झा, राजेंद्र जाधव, अजहर शहा, अब्दुल कदीर बापू, शिलाताई भारती, संग्रामराजे देशमुख, लक्ष्मण ठोंबरे, रामेश्वर जंजाळ, गंगाधर कांबळे, प्रल्हाद पा. गोरे, रामदास रोडे, राजू खिरे, मुजीब कादरी, आण्णासाहेब भालेराव, प्रा. अमर शेख, साहेबराव दसपुते, दत्ता पा. पुंगळे, रावसाहेब दाभाडे, ड. गजानन गावंडे, पुंजाराम साबळे, जयराम मुठ्ठे, रमेश पा. बरडे, प्रल्हाद पा. लोखंडे, रहेमानभाई, प्रा. पंडितराव इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बीएलए उपस्थित होते.

आता मैदान आमचेच कार्यकर्त्यांचा निर्धार

बैठकीच्या अखेरीस गावागावात संघटन बूथवर मजबूत पकड आणि जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष या त्रिसूत्रीवर काम करण्याचा निर्धार करण्यात आला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा विजय निश्चित करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने मैदानात उतरावे असा एकमुखी ठराव करण्यात आला.

भोकरदनच्या राजकीय मैदानात आगामी काळात तुतारी विरुद्ध इतर अशी थेट लढत रंगण्याचे संकेत या बैठकीतून मिळाले असून राष्ट्रवादीच्या या आक्रमक मोर्चेबांधणीने स्थानिक राजकारणाची समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

---

# १४५ विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा २०० मिली दूध

## दहिफळ भोंगाणे ग्रामपंचायतीचा विद्यार्थीहिताचा स्तुत्य उपक्रम सुदृढ विद्यार्थी सक्षम विद्यार्थी संकल्पनेला बळ

परतूर प्रतिनिधी :-

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या आरोग्य आणि पोषणाकडेही गांभीर्याने लक्ष देत दहिफळ भोंगाणे ग्रामपंचायतीने एक अभिनव आणि कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने अंतर्गत येणाऱ्या तीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील तब्बल १४५ विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस प्रत्येकी २०० मिली दूध वाटप करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ २० ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

दहिफळ भोंगाणे पश्चिम दहिफळ भोंगाणे पूर्व आणि दहिफळ भोंगाणे तांडा या तीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या वयातील पोषणाच्या गरजा लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने घेतलेल्या या निर्णयामुळे पालक व ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त होत आहे.

दूधातून पोषणाला हातभार

दूध हे विद्यार्थ्यांच्या शारीरिक वाढीसाठी आवश्यक पोषक घटकांचे महत्त्वाचे स्रोत मानले जाते.नियमित दूध सेवनामुळे विद्यार्थ्यांच्या पोषणात भर पडण्यास मदत होणार असून, त्याचा त्यांच्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा आहे. सुदृढ विद्यार्थी सक्षम विद्यार्थी ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेत येण्याचा उत्साह वाढण्यासोबतच त्यांच्या अध्ययन प्रक्रियेलाही चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि शारीरिक विकास यांनाही प्राधान्य देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

ग्रामस्थ,पालकांकडून स्वागत

उद्घाटनप्रसंगी सरपंच सौ. यमुनाताई राठोड,उपसरपंच रामेश्वर डवले,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता रोकडे,संदिप चव्हाण, गजानन दगडूबा भोंगाणे, केंद्रप्रमुख मंगेश कोकणे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य,पालक, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तीनही शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकांनीही या उपक्रमास सहकार्य केले.दहिफळ भोंगाणे पूर्व शाळेचे मुख्याध्यापक पेंटू विठ्ठल मैसनवाड,दहिफळ भोंगाणे पश्चिम शाळेचे मुख्याध्यापक विनायक भिसे,दहिफळ भोंगाणे तांडा शाळेचे मुख्याध्यापक रामलिंग नाडे, तसेच काळे सर व इतर शिक्षकांची उपस्थिती होती.

इतर ग्रामपंचायतींसाठी आदर्श उपक्रम

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य, पोषण आणि सर्वांगीण विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक शिक्षक आणि ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.केवळ शाळेच्या भौतिक सुविधांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणारा हा उपक्रम इतर ग्रामपंचायतींसाठीही दिशादर्शक ठरणारा आहे.

---

# मौजे बठाण बु.गट क्र. १०४ मधील अतिक्रमण हटवून रस्ता खुला करण्याचे आदेश

### जिल्हाधिकाऱ्यांची समिती गठित नायब तहसीलदार पोलीस निरीक्षक व भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावे

जालना प्रतिनिधी :- तालुक्यातील मौजे बठाण बु. येथील गट क्रमांक १०४ मधील अधिकृत अतिक्रमण रस्त्यावर झाल्याचा आरोप असलेले अतिक्रमण हटवून रस्ता खुला करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासनाला निर्देश दिले आहेत.यासाठी नायब तहसीलदार पोलीस निरीक्षक आणि भूमी अभिलेख विभागाच्या मोजणीदारांचा समावेश असलेली समिती गठित करण्यात आली आहे.

गट क्रमांक १०४ मधील रस्त्याची भूमी अभिलेख विभागामार्फत १५ मे २०२६ रोजी मोजणी पूर्ण करून हद्दखुणा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर मोजणीनुसार रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करण्याची मागणी श्री. रवि बागल,श्री.दिगंबर बागल यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. या मागणीसाठी संबंधित नागरिकांनी आमरण उपोषण सुरू होते असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी तहसील कार्यालय जालना तसेच संबंधित विभागांकडून यापूर्वी पत्रव्यवहार करण्यात आला होता. ३० जुलै २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार अतिक्रमण हटविण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र कार्यवाहीबाबत ग्रामस्थांकडून पाठपुरावा सुरू असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने आता संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती करून कारवाईला गती देण्याचे निर्देश दिले आहेत.

तीन अधिकाऱ्यांवर जबाबदारी

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार या कार्यवाहीसाठी नायब तहसीलदार श्री. देविदास खटावकर, तालुका पोलीस ठाणे जालना येथील पोलीस निरीक्षक श्री. उज्जैनकर आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय जालना येथील मोजणीदार श्री. रमेश कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी आवश्यक ती कार्यवाही करून गट क्र. १०४ मधील रस्त्यावरील अतिक्रमणाचा प्रश्न नियमानुसार मार्गी लावावा असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या प्रश्नावर आता प्रशासन कोणती ठोस कारवाई करते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

---

# विद्यापीठामुळे मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन उत्साहात

जालना शेख फारुक :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचा ६८ वा वर्धापन दिन अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ गीत व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस म्हणाले की मराठवाड्यासारख्या तुलनेने मागासलेल्या भागात विद्यापीठाची स्थापना झाल्याने या परिसराच्या सामाजिक,शैक्षणिक, आर्थिक,औद्योगिक तसेच राजकीय विकासाला मोठी चालना मिळाली आहे. विद्यापीठाने ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली असून अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली आहे.विद्यापीठाच्या माध्यमातून काळानुरूप विविध नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. बदलत्या शैक्षणिक व रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहनही प्राचार्य डॉ.गजहंस यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भुजंग डावकर,प्रा.डॉ.ज्ञानेश्वर चौधरी,प्रा.चंद्रकांत लाटेकर, स्टाफ सेक्रेटरी डॉ.निखिल गायकवाड,डॉ.शंकर तिकांडे, डॉ.पंडित राणमाळ,डॉ. कार्तिक गावंडे,डॉ.रामदास वैद्य,डॉ.रामनाथ सांगोळे,डॉ. अर्जुन जाधव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# मानवजातीच्या समस्यांवर पैगंबरांच्या शिकवणीतच मार्गदर्शन

रहमत-ए-आलम ﷺ अभियानातून सामाजिक विकृतींविरोधात जनजागृती जालना येथील बागबान मस्जिदीत जाहीर भाषण

जालना शेख फारुक :- अल्लाहचे पैगंबर हजरत मुहम्मद मुस्तफा ﷺ यांना संपूर्ण मानवजातीसाठी कृपा म्हणून पाठविण्यात आले आहे.त्यांच्या शिकवणीत मानवाच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच सामाजिक समस्यांवरही मार्गदर्शन आहे. पैगंबर मुहम्मद ﷺ यांच्या शिकवणीचे आचरण केल्यास इहलोकासह परलोकातही यश मिळू शकते असे प्रतिपादन मौलाना मुहम्मद मुश्ताक अहमद फलाही यांनी केले.

वह्दत-ए-इस्लामी हिंद जालना यांच्या वतीने रहमत-ए-आलम ﷺ अभियानांतर्गत शनिवारी दि. २२ रात्री इशाच्या नमाजानंतर बागबान मस्जिद कदिम जालना येथे जाहीर भाषणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मौलाना फलाही मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थी अम्मार यासिर यांनी पवित्र कुराण पठणाने केली. लियाकत अली खान यासिर जालनावी यांनी प्रास्ताविकातून अभियानाची भूमिका स्पष्ट केली. वह्दत-ए-इस्लामी हिंदच्या वतीने १६ ते २६ ऑगस्टदरम्यान रहमत-ए-आलम ﷺ अभियान राबविण्यात येत असून या अभियानातून आत्महत्या स्त्रीभ्रूणहत्या अमली पदार्थांचे व्यसन आणि वायू प्रदूषण यांसारख्या गंभीर सामाजिक समस्यांबाबत जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

सामाजिक समस्यांवर पैगंबरांच्या शिकवणीत मार्गदर्शनमौलाना मुश्ताक अहमद फलाही म्हणाले की आज मानवजातीसमोर आत्महत्या स्त्रीभ्रूणहत्या अमली पदार्थांचे व्यसन आणि प्रदूषण यांसारख्या गंभीर समस्या आहेत.या समस्यांकडे केवळ कायदा व प्रशासनाच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी त्यामागील नैतिक व सामाजिक कारणांवरही विचार होणे आवश्यक आहे. पैगंबर मुहम्मद ﷺ यांच्या शिकवणीत मानवाला संयम दया बंधुभाव नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश मिळतो.त्यामुळे त्यांच्या शिकवणीचे आचरण समाजासाठी मार्गदर्शक ठरू शकते.पैगंबर मुहम्मद ﷺ यांचा संदेश हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी आहे. सत्याचा स्वीकार न करणाऱ्यांवरही



त्यांच्या संदेशाचे उपकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मानवाने या शिकवणीतील मूल्ये आत्मसात केली तर अनेक सामाजिक विकृतींवर नियंत्रण मिळविणे शक्य होईल असेही मौलाना फलाही यांनी नमूद केले.मानवी मूल्यांची जपणूक काळाची गरज

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत मानवी मूल्यांची जपणूक आणि नैतिक जीवनपद्धतीचा स्वीकार आवश्यक आहे. समाजातील विविध समस्यांवर दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी प्रत्येकाने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

लियाकत अली खान यासिर जालनावी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले. मौलाना मुहम्मद मुश्ताक अहमद फलाही यांच्या प्रार्थनेने जाहीर भाषणाचा समारोप झाला.

# गणेशोत्सवापूर्वी जयसिंगपूर पोलिसांचा 'ॲक्शन मोड'

## १५० सराईत गुन्हेगारांची झाडाझडती, समाजमाध्यमांवरही करडी नजर

जयसिंगपूर । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सव शांततेत पार पडावा यासाठी कोल्हापूर पोलीस दलाने प्रतिबंधात्मक कारवाईला वेग दिला आहे. जयसिंगपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली, परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी ज्ञानेश गवई तसेच उपविभागातील प्रभारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत १५० सराईत व रेकॉर्डवरील गुन्हेगारांची विशेष झाडाझडती घेण्यात आली.

या कारवाईत संबंधितांच्या पूर्वीच्या गुन्ह्यांची माहिती, सध्याच्या हालचाली आणि समाजमाध्यमांवरील खात्यांची पडताळणी करण्यात आली. कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या हालचाली आढळल्यास कठोर कारवाईचा इशारा देत संबंधितांना समज देण्यात आली.

गणेशोत्सवात मारामारी, हुल्लडबाजी, दहशत किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रकारांना थारा दिला जाणार नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. आक्षेपार्ह पोस्ट,



धमकीवजा मजकूर, अफवा किंवा दोन गटांत तेढ निर्माण करणाऱ्या संदेशांवरही पोलिसांची नजर राहणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल आणि अपर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात रेकॉर्ड अद्ययावत करणे, प्रतिबंधात्मक कारवाई आणि संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

गणेश मंडळे, कार्यकर्ते व नागरिकांनी नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. गणेशोत्सवात कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा जयसिंगपूर पोलिसांनी दिला आहे.



# यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांनी वैचारिक दारिद्र्य दूर करणे शक्य : डॉ. शिवाजीराव देशमुख

लातूर प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण तीन दिवसीय व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, लातूरचे सचिव प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार होते. विचारपीठावर जयक्रांती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. गोविंद घार, डॉ. विवेक सौताडेकर, ड. वसंतराव उगले, ड. शेखर हविले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विवेक सौताडेकर, सूत्रसंचालन भीमराव दुनगावे, व्याख्यात्यांचा परिचय प्रा. विद्याधर कांदे पाटील, तर आभार प्राचार्य डॉ. कुसुम मोरे यांनी मानले.

# आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदनगरात १ हजार डस्टबिनचे वाटप

### 'स्वच्छ प्रभाग, सुंदर प्रभाग'चा संकल्प नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

पूर्णा प्रतिनिधी

गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त पूर्णा शहरातील आनंदनगर, प्रभाग क्रमांक दोन येथे नागरिकांना १ हजार डस्टबिनचे वाटप करण्यात आले. अमृत मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. विमलबाई कदम होत्या.

कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक तथा आरोग्य व स्वच्छता सभापती सौ. मीरा होळकर व विश्वनाथ होळकर यांनी केले. घरातील कचरा रस्त्यावर, नालीत किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता डस्टबिनमध्ये जमा करून परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमास तालुका प्रभारी नितीन उर्फ बंटी कदम, विधानसभा प्रमुख सुधाकर खराटे, जिल्हा मध्यवर्ती संचालक नंदूकुमार डाखोरे, तालुकाध्यक्ष सुभाषराव देसाई, उपनगराध्यक्ष मुकुंद भोळे, जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, नगरसेवक सुनील जाधव, ॲड. राजेश भालेराव, शेख मुजीब, शेख हबीब, मिलिंद कांबळे,



किशोर सूर्यवंशी, शहराध्यक्ष ईश्वर ठाकूर, सरपंच सैनाजी माटे, उत्तमराव ढोणे, रमेश सूर्यवंशी, सज्जन जयस्वाल यांच्यासह महिला, नागरिक, मित्र मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


वाढदिवसाला सामाजिक उपक्रमाची जोड देत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले. 'स्वच्छ प्रभाग, सुंदर प्रभाग' या संकल्पनेतून नागरिकांनी डस्टबिनचा नियमित वापर करून स्वच्छतेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

# ज्येष्ठ पत्रकार अनुपकुमार भार्गव यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची भावपूर्ण श्रद्धांजली

नागपूर प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नागपूर विदर्भ अध्यक्ष तथा दैनिक पुलगाव टाइम्सचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार स्व. अनुपकुमार भार्गव यांचे नागपूर येथे उपचारा दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाच्या अवघ्या आठ दिवसांपूर्वी त्यांच्या मातोश्री स्व. पार्वतीदेवी यांचेही निधन झाले. या दुहेरी दुःखाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भार्गव कुटुंबीयांची सांत्वन भेट घेऊन स्व. अनुपकुमार भार्गव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी स्व. भार्गव यांच्या पत्रकारिता आणि पत्रकार चळवळीतील कार्याच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. 'दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रा' तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी झालेल्या आंदोलनांमध्ये त्यांनी वसंतराव मुंडे आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस



### पत्रकारांच्या हक्कांसाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणारा लढवय्या हरपला, भार्गव कुटुंबीयांना संघटनेचा आधार

तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सोबत सक्रिय सहभाग घेतला होता. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला. त्यांचे समर्पण आणि कार्यतत्परता पुढील पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

दुःखाच्या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भार्गव कुटुंबीयांना रोख आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन संघटनेची संवेदना व्यक्त करण्यात आली. यावेळी स्व. भार्गव यांचे ज्येष्ठ बंधू, नामांकित विधितज्ज्ञ तथा ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश भार्गव, अशोककुमार भार्गव, अतुलकुमार भार्गव, अरविंद भार्गव, त्यांच्या पत्नी, भावजय व चार मुली उपस्थित होत्या.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, मराठवाडा संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर, उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख विजय शेळके यांच्यासह पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

स्व. अनुपकुमार भार्गव यांच्या कार्याला अभिवादन करताना, दुःखाच्या या कठीण प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ भार्गव कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वास यावेळी देण्यात आला.

# जगण्याचे प्रश्न सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण महत्त्वाचे : प्रा. गौतम गायकवाड

अंबाजोगाई प्रतिनिधी

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव होते. विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण प्रा. डॉ. किसन शिनगारे यांच्या हस्ते झाले.

प्रमुख मार्गदर्शक प्रा. गौतम गायकवाड म्हणाले की, केवळ पदवी संपादन करून चालणार नाही, तर विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपन्न, चारित्र्यसंपन्न आणि कौशल्यसंपन्न बनणे आवश्यक आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांसमोरील बदलत्या शैक्षणिक आव्हानांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा दाखला देत त्यांनी विद्यार्थ्यांनी सातत्याने ज्ञानार्जन करावे, असे सांगितले. शिक्षकांनी आपल्या कार्याशी प्रामाणिक राहून



मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन उत्साहात

विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण ज्ञान द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रा. डॉ. हनुमंत साळुंखे यांनी आजीवन शिक्षण विस्तार विभागाची माहिती दिली. विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त या विभागाचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांनी विद्यापीठ स्थापनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगून विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन केले.कार्यक्रमात वैभवी, माहेश्वरी, ऋतुजा व साक्षी यांनी समाजजागृतीपर गीत सादर केले. प्रास्ताविक अक्षय गायकवाड, सूत्रसंचालन प्रणाल, तर आभार दयानंद यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मानवलोकचे कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

# नागसेन बुद्ध विहाराच्या विकासासाठी ३५ लाखाचा निधी

## पप्पू कागदे यांचे मोलाचे योगदान

बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील पालवण चौक धानोरा रोड येथील नागसेन बुद्ध विहाराच्या शोभीकरणासाठी विविध विकासाची कामे करण्यासाठी रविवार (दि.२३) ऑगस्ट रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते ३५ लक्ष रुपयांच्या विकास कामाचा उदघाटन सोहळा संपन्न करण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी व धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी नागसेन बुद्ध विहारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या माध्यमातून शिल्लक राहिलेल्या




रक्कमेतून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. नागसेन बुद्ध विहारात भव्य कमान, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व विहाराच्या विविध विकास कामासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मोलाचे योगदान देऊन ३५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, शितलकुमार सुकाळे, अड. भगवान कांडेकर, नगरसेवक प्रमोद शिंदे, रणजीत बनसोडे, भास्कर सरपते, अच्युत उजगरे, विठ्ठलराव गाडे, अड कल्याणराव गाडे, सुंदरराव तांगडे, रोहिदास वाघमारे, अभिमन्यू सोनवणे, उमाजी आठवले, श्रीमंत उजगरे, मारुती सुरवसे, सुनील कांबळे, मनोज वाघमारे, बबनराव पंडित, सुमित जोगदंड, डीजे कांबळे, अश्रुबा शिंदे, बाळू डोळस, ईश्वर धन्वे, विनोद औसरमल, मधुकर गायकवाड, आर.एम वाघमारे, गौतम कांबळे, संजय हनुमते, प्रा. संजय घाडगे, केशरताई कांबळे, रेखाताई सोनवणे, छाया धन्वे, शाम वीर, शिंदे ताई, दयानंद उजगरे, धम्मा पारवेकर, सोनवणे फौजी, भास्कर जावळे यांच्यासह शेकडो उपासक-उपासिका उपस्थित होते.

नागसेन बुद्ध विहारातील उदघाटन सोहळा यशस्वी करण्यासाठी मनोज नाना मस्के यांनी विशेष परिश्रम घेतले.



बीड प्रतिनिधी

बीड येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शिवसेना विधानसभा प्रमुख नवनाथराव गवते यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी बीड जिल्हा शिवसेना संघटक विक्रमराजे भोसले व तांदळा येथील ग्रामस्थ उपस्थित होते. त्यानंतर सहकारी मित्र आकाश भैय्या मसवले यांच्या वाढदिवसानिमित्त सिव्हिल हॉस्पिटलमधील रुग्णांना अन्नदान करण्यात आले. यावेळी रुग्णांची आस्थेने विचारपूस करून त्यांना धीर देताना शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत नवले.

# सौ. के.एस.के महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा



बीड प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन चैतन्यमय वातावरणात पार पडला. या विशेष प्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते मुख्य प्रांगणात विद्यापीठाचा ध्वज फडकवून ध्वजारोहण करण्यात आले.

सकाळी ठीक ७:४५ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहनास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर संचालक डॉ. शंकर राऊत, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. खुटाळे ए. डी. यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सचिव महोदयांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर उपस्थितांनी विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन केले,

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आष्टीत अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उभारणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

## माजी आ.भीमराव धोंडे यांची नागपुरातील अमेरिकन कॅन्सर हॉस्पिटलला भेट

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील कॅन्सरग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आष्टी येथे मोठे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केला असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या दिशेने प्रत्यक्ष अभ्यासाला सुरुवात झाली आहे. प्रस्तावित कॅन्सर हॉस्पिटलसाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय, तांत्रिक, प्रशासकीय तसेच रुग्णसेवेशी संबंधित सुविधांचा सखोल अभ्यास करण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी रविवारी नागपूर येथील अमेरिकन कॅन्सर हॉस्पिटलला भेट देऊन तेथील अत्याधुनिक सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी हॉस्पिटल प्रशासनाशी सविस्तर चर्चा करून कॅन्सर रुग्णांच्या निदानापासून उपचारापर्यंतच्या संपूर्ण व्यवस्थेची माहिती घेतली. कॅन्सरच्या विविध प्रकारांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आधुनिक उपचार पद्धती, अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री, विविध उपचार विभाग, रुग्णांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची आवश्यकता, रुग्णसेवेची कार्यपद्धती तसेच हॉस्पिटलच्या प्रशासकीय व्यवस्थेबाबत माजी आ. भीमराव धोंडे यांनी हॉस्पिटलच्या प्रमुखांशी चर्चा केली. प्रस्तावित हॉस्पिटलमध्ये कोणत्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे, कॅन्सरचे अचूक निदान करण्यासाठी कोणती अत्याधुनिक उपकरणे आवश्यक आहेत, शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन थेरपी यांसह विविध उपचार पद्धतींसाठी कोणत्या स्वरूपाची यंत्रणा उभारावी लागेल आणि रुग्णांना सर्वसमावेशक उपचार सेवा एकाच छताखाली कशा पद्धतीने उपलब्ध करून देता येईल, याबाबतही त्यांनी माहिती जाणून घेतली. माजी आ. भीमराव धोंडे यांच्यासोबत असलेल्या पथकाने हॉस्पिटलमधील विविध विभागांची पाहणी करून प्रस्तावित कॅन्सर हॉस्पिटलच्या उभारणीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींच्या नोंदी केल्या. बीड जिल्ह्यात कॅन्सर रुग्णांची संख्या लक्षात घेता स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध झाल्यास रुग्णांना उपचारासाठी मुंबई, पुणे, नागपूर किंवा इतर मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. सध्या कॅन्सरच्या उपचारासाठी मोठ्या शहरांकडे जावे लागल्याने रुग्ण आणि त्यांच्या





कुटुंबीयांवर आर्थिक, मानसिक आणि शारीरिक ताण निर्माण होतो. प्रवासाचा खर्च, राहण्याचा खर्च, उपचारासाठी लागणारा वेळ आणि वारंवार होणारी ये-जा यामुळे अनेक कुटुंबांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. आष्टी येथेच अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उभारले गेले तर बीड जिल्ह्यासह परिसरातील ग्रामीण भागातील रुग्णांना त्यांच्या जवळच्या ठिकाणी दर्जेदार उपचार मिळण्याची मोठी सुविधा निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित हॉस्पिटलमध्ये आधुनिक निदान केंद्र, विविध कॅन्सर उपचार विभाग, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, शस्त्रक्रिया सुविधा, रेडिएशन व इतर आवश्यक उपचार व्यवस्था, रुग्णांसाठी निवास व सहाय्यक सुविधा तसेच तज्ज्ञ वैद्यकीय मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अभ्यास केला जात आहे. केवळ हॉस्पिटलची इमारत उभारणे एवढाच उद्देश न ठेवता रुग्णांना निदानापासून उपचारापर्यंत सर्वसमावेशक आणि दर्जेदार सेवा मिळावी, या दृष्टीने नियोजन करण्यात येत असल्याचे या भेटीतून स्पष्ट झाले आहे. बीड जिल्ह्यातील कॅन्सरग्रस्त रुग्णांना उपचारासाठी दूरवर जावे लागू नये आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, यासाठी स्थानिक पातळीवर सक्षम आरोग्य सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. याच विचारातून माजी आ. भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे मोठे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प केला असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक बाबीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यास सुरुवात केली आहे. नागपूर येथील अमेरिकन कॅन्सर हॉस्पिटलला दिलेली भेट ही या नियोजन प्रक्रियेतील महत्त्वाची पायरी मानली जात आहे. दरम्यान, अमेरिकन कॅन्सर हॉस्पिटलच्या पाहणीनंतर माजी आ. भीमराव धोंडे यांनी नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीलाही भेट दिली. यावेळी त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचे स्मरण करून त्यांनी त्यांच्या विचारांना अभिवादन केले. एकीकडे आरोग्यसेवेच्या क्षेत्रात आष्टीसह बीड जिल्ह्यासाठी अत्याधुनिक कॅन्सर उपचार सुविधा उभारण्याच्या दिशेने अभ्यास आणि नियोजन सुरू असताना, दुसरीकडे नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून माजी आ. भीमराव धोंडे यांनी सामाजिक बांधिलकीचा संदेशही दिला. आष्टी येथे प्रस्तावित असलेल्या कॅन्सर हॉस्पिटलमुळे भविष्यात बीड जिल्ह्यातील तसेच आसपासच्या ग्रामीण भागातील कॅन्सर रुग्णांना मोठा आधार मिळू शकतो. या प्रकल्पासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे, उपचार पद्धती, तज्ज्ञ डॉक्टर, विविध विभागांची रचना, रुग्णसेवा व्यवस्था आणि प्रशासकीय नियोजन यांचा अभ्यास करून सक्षम आरोग्य सुविधा उभारण्याच्या दिशेने माजी आ. भीमराव धोंडे यांचे प्रयत्न सुरू असून, आष्टीत कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याचा

## स्वातंत्र्यदिनी कै.बुधाजी नाना गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'गुरुगौरव पुरस्कार' प्रदान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, दादेगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे स्वातंत्र्यसैनिक कै. बुधाजी नाना गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्वातंत्र्य दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा 'गुरुगौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. आदर्श माध्यमिक शिक्षक श्री. नानासाहेब बुधाजी गायकवाड यांनी आपल्या वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी हा उपक्रम सन १९९७ पासून सुरू केलेला आहे.

यापूर्वीच श्री. नानासाहेब बुधाजी गायकवाड यांनी दादेगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास तसेच मराठी विषयात ८० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. स्वातंत्र्यसैनिक बुधाजी नाना गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'गुरुगौरव पुरस्कार' व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्याचे जाहीर केले होते.

त्यानुसार यावर्षी इयत्ता दहावीमध्ये शाळेतून प्रथम क्रमांक मिळविणारी कु. बडे शुभश्री लक्ष्मण हिचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच मराठी विषयात ८० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कु. बडे संस्कृती बाबासाहेब ९२ गुण, कु. बडे शुभश्री लक्ष्मण ८७ गुण आणि कु. मोरे विद्या राजेंद्र ८१ गुण




मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना 'गुरुगौरव पुरस्कार' व स्मृतिचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ यांच्या शुभहस्ते या गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देतानाच स्वातंत्र्यसैनिक कै. बुधाजी नाना गायकवाड यांच्या सामाजिक व देशसेवेच्या कार्याच्या स्मृती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.या पुरस्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रगतीची प्रेरणा निर्माण होऊन स्पर्धात्मक वृत्तीला चालना मिळणार आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सार्वजनिक सन्मान केल्यामुळे इतर विद्यार्थ्यांनाही अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. बुधाजी नाना गायकवाड यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू करण्यात आलेला 'गुरुगौरव पुरस्कार' हा शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारा उपक्रम ठरत आहे.

## बीड जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा आ.सुरेश धस यांच्या हस्ते सत्कार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आष्टी येथील अद्वैतचंद्र निवासस्थानी लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी आ. सुरेश धस यांच्या हस्ते बीड जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या भेटीदरम्यान आ. सुरेश धस यांनी उपस्थित वकिलांशी मनमोकळा संवाद साधत न्यायव्यवस्था, वकिलांची सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वकील संघाची भूमिका याबाबत चर्चा केली.

बीड जिल्हा वकील संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ड. बी. एस. बोडखे, उपाध्यक्षपदी ड. गोपाल सर्वज्ञ, सचिवपदी ड. नितीन शिंदे तर ग्रंथपालपदी ड. वनदेव सूळ यांची निवड झाली आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आ. सुरेश धस यांची सदिच्छा भेट घेतल्यानंतर आ. धस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आ. सुरेश धस यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



यावेळी बोलताना आ. सुरेश धस यांनी सांगितले की, न्यायव्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा म्हणून वकिलांची भूमिका अत्यंत जबाबदारीची आणि महत्त्वपूर्ण आहे. सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर मार्गदर्शन मिळवून देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे तसेच न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावीपणे बाजू मांडणे, हे वकिलांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. त्यामुळे वकील संघ हा केवळ वकिलांच्या व्यावसायिक हितासाठी कार्य करणारा संघ न राहता सामाजिक प्रश्नांमध्येही सकारात्मक भूमिका बजावणारा सक्षम मंच ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

बीड जिल्हा वकील संघाला न्यायालयीन क्षेत्रात मोठी परंपरा असून जिल्ह्यातील न्यायव्यवस्थेच्या प्रभावी वाटचालीमध्ये संघाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली वकील संघाच्या माध्यमातून वकिलांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देतानाच सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक उपक्रम राबविले जातील, असा विश्वासही आ. सुरेश धस यांनी व्यक्त केला.

नवीन पदाधिकाऱ्यांनी वकील बांधवांच्या अपेक्षा पूर्ण करण्याबरोबरच संघटनेची एकजूट अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावेत. न्यायालयीन कामकाजात व्यावसायिक गुणवत्ता, शिस्त, पारदर्शकता आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य देत काम केल्यास बीड जिल्हा वकील संघाची राज्यातही वेगळी ओळख निर्माण होईल, असेही आ. धस यांनी यावेळी सांगितले.

या सदिच्छा भेटीमुळे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आ. सुरेश धस यांनी केलेल्या सत्काराबद्दल व शुभेच्छांबद्दल उपस्थित वकिलांनी त्यांचे आभार मानले. आगामी काळात बीड जिल्ह्यातील वकील बांधवांच्या विविध प्रश्नांसाठी तसेच न्यायव्यवस्थेशी संबंधित सामाजिक उपक्रमांसाठी सकारात्मक भूमिका घेण्याचा निर्धार नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी माजी अध्यक्ष ड. रोहिदास येवले, माजी सचिव ड. शहादेव ननवरे, मावळते अध्यक्ष ड. सुभाष पिसोरे, ड. राजू शिंदे, ड. वाय. पी. अनवणे यांच्यासह बीड जिल्हा वकील संघातील अन्य मान्यवर वकील उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार आणि आ. सुरेश धस यांच्यासोबत झालेल्या संवादामुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.




## शिक्षणातून सामाजिक क्रांती केल्याबद्दल

### प्रा. डॉ.कविता गित्ते कराड यांचे हार्दिक अभिनंदन - मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या आयुष्याला शिक्षणाची दिशा देणाऱ्या प्रा.डॉ.कविता गित्ते मुख्याध्यापिका, साने गुरुजी निवासी विद्यालय,केज यांनी

ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणा साठी आणिसामाजिक जनजागृतीसाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. विशेष अभिनंदन संदेश ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणा साठी आणिसामाजिक जनजागृतीसाठी प्रा.डॉ.कविता गित्ते कराड मॅडम यांनी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. 'राज्यस्तरीय आयडॉल शिक्षक' पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!अशा शब्दात

मा.श्री.जितीन रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. गेल्या २९ वर्षांत त्यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.१०,००० पेक्षा जास्त ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना शिक्षण आणि उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन केले आहे. २१० + विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर सॉफ्टबॉल व बेसबॉल क्रीडा प्रकारात यशस्वी झाले आहेत.'कोयता एक संघर्ष...', 'A Look at Sugarcane Workers' यांसह विविध पुस्तके व लेख प्रसिद्ध झाले आहेत.

अनेक बालविवाह रोखण्यात यश व जनजागृती त्यांनी केली आहे.त्यांच्या माध्यमातून शाळेने यश व सन्मान मिळवले आहेत.आय एस ओ मानांकन व स्कॉफ मूल्यमापनात 'A+' श्रेणी,'मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा'पुरस्कार (सलग २ वर्षे),गांधी रिसर्च फाउंडेशन,जळगावचा 'स्वच्छ शाळा,सुंदर शाळा' प्रथम पुरस्कार (सलग २ वर्षे),राज्य स्तरीय 'आयडॉल शिक्षक' म्हणून विशेष सन्मान असे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. अशा शब्दात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितीन रहेमान यांनी शुभेच्छा देताना म्हटले आहे.

## दोन वर्षांच्या गुप्त वावरानंतर ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्ट दर्शन! आष्टीच्या जगलात पट्टेदार वाघाचे बस्तान...!!!

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कायम बिबट्यांचा वावर असलेल्या आष्टी तालुक्यातील डोंगराळ व घनदाट वनक्षेत्रात आता चक्क एका पट्टेदार वाघाने बस्तान बसवल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या दोन वर्षांपासून या परिसरात अत्यंत गुप्तपणे वावरणाऱ्या या वाघाचे अखेर ब्रह्मगाव शिवारात वनविभागाने लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्ट दर्शन झाले. १९ ऑगस्ट रोजी या परिसरात ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आल्यानंतर २० ऑगस्ट रोजी फुटेज तपासताना पूर्ण वाढ झालेला पट्टेदार वाघ कॅमेऱ्यात कैद झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आष्टी तालुक्यात वाघाचे वास्तव्य असल्याच्या चर्चेला अधिकृत दुजोरा मिळाला असून ब्रह्मगाव, देवळालीसह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आष्टी तालुक्यात डोंगराळ भागाचे तसेच नैसर्गिक झाडीझुडपांचे आणि घनदाट वनक्षेत्राचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे या परिसरात सुरुवातीपासूनच बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आढळून येतो. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून या भागात आढळणाऱ्या काही संशयास्पद हालचालींमुळे एखादा मोठा वन्यजीव परिसरात वावरत असल्याचा संशय वनविभागाला आला होता. जंगल परिसरात आढळलेल्या मोठ्या पाऊलखुणा तसेच वन्यप्राण्यांच्या शिकारीची वेगळी पद्धत यामुळे वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष या हालचालींकडे गेले होते. ऑक्टोबर आणि डिसेंबर २०२५ मध्येही जंगल परिसरात काही संशयास्पद हालचालींची नोंद झाली होती. मात्र, प्रत्यक्ष दर्शन किंवा ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने या वन्यजीवाची ओळख निश्चित होत नव्हती.

दरम्यान, अलीकडेच ब्रह्मगाव शिवारात एका मोठ्या पाळीव जनावराची शिकार झाल्यानंतर वनविभागाने या परिसरात अधिक गांभीर्याने पाहणी सुरू केली. या घटनेनंतर १९ ऑगस्ट रोजी ब्रह्मगाव शिवारासह परिसरात वनविभागाने ट्रॅप कॅमेरे बसविले. या कॅमेऱ्यांमधून वन्यप्राण्यांच्या हालचालींची नोंद घेण्यात येत होती. दुसऱ्याच दिवशी, २० ऑगस्ट रोजी कॅमेऱ्यातील फुटेज तपासले असता त्यामध्ये एक पूर्ण वाढ झालेला पट्टेदार वाघ स्पष्टपणे कैद झाल्याचे दिसून आले. त्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून गुप्तपणे वावरणाऱ्या या वाघाचे अस्तित्व अखेर स्पष्ट झाले.

वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, शेजारील जिल्ह्यांतील घनदाट जंगलातून भक्ष्य आणि पाण्याच्या शोधात हा वाघ आष्टी तालुक्यात दाखल झाला असावा. परिसरातील नैसर्गिक अधिवास, मुबलक खाद्य आणि पाण्याची उपलब्धता यामुळे त्याने या भागातच मुक्काम केला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. देवळाली आणि ब्रह्मगाव परिसरात सातत्याने मोठ्या जनावरांच्या शिकारीच्या घटना समोर येत असल्याने वाघाच्या वास्तव्याशी त्याचा संबंध असण्याची शक्यताही वनविभागाकडून तपासली जात आहे.

वाघाचे अस्तित्व स्पष्ट झाल्यानंतर परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या चिंतेत मोठी वाढ झाली आहे. शेतीची कामे करण्यासाठी शेतकऱ्यांना पहाटे किंवा सायंकाळच्या वेळी शेतात जावे लागते. अनेक शेतजमिनी जंगल व डोंगराळ भागालगत असल्याने वन्यप्राण्यांच्या हालचालींचा धोका कायम असतो. आता पट्टेदार वाघाचे अस्तित्व स्पष्ट झाल्यामुळे शेतीची कामे करताना नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः जनावरे चरायला नेणे, शेतातील कामे करणे आणि रात्रीच्या वेळी शेताकडे जाणे याबाबत ग्रामस्थ अधिक सावध झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे यांनी परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. शेतात जाताना सोबत काठी ठेवावी, शेतात काम करताना शक्यतो मोठा आवाज करावा तसेच



प्रतिबंधात्मक उपाय म्हणून फटाके वाजवावेत, अशा सूचना वनविभागाने दिल्या आहेत. नागरिकांनी शक्यतो रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात जाऊ नये, अशी कडक सूचना करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी वनविभागाच्या कार्यालयात आवश्यक सुरक्षा साधने सज्ज ठेवण्यात आली असून वाघाच्या हालचालींवर रात्रंदिवस लक्ष ठेवण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

वाघ दिसल्यास नागरिकांनी त्याच्या जवळ जाण्याचा, त्याचा पाठलाग करण्याचा अथवा त्याला चिथावण्याचा प्रयत्न करू नये. तसेच वाघाच्या दर्शनाबाबत कोणतीही अफवा किंवा अप्रमाणित माहिती पसरवू नये. वाघ दिसल्यास तत्काळ वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे यांनी केले आहे. वन्यजीवांपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी प्रशासकीय पातळीवर घेतली जात असल्याचेही वनविभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, ब्रह्मगाव शिवारातील ट्रॅप कॅमेऱ्यात पट्टेदार वाघ कैद झाल्याचे स्पष्ट झाल्याने वनविभागाच्या यंत्रणेची जबाबदारी आता अधिक वाढली आहे. वाघाच्या हालचालींचा मार्ग, त्याचे वास्तव्याचे क्षेत्र, भक्ष्याची उपलब्धता आणि तो कोणत्या दिशेने संचार करीत आहे, याचा मागोवा घेण्यासाठी कॅमेऱ्यांच्या माध्यमातून निरीक्षण सुरू ठेवण्यात आले आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि वाघाचे संरक्षण या दोन्ही बाबींचा समतोल राखत वनविभागाकडून पुढील कार्यवाही केली जात आहे.

आष्टी तालुक्यातील जंगल परिसरात आतापर्यंत बिबट्यांचा वावर परिचित असला तरी पट्टेदार वाघाचे स्पष्ट दर्शन ही स्थानिकांसाठी नवी आणि गंभीर बाब ठरली आहे. गेल्या दोन वर्षांपासून कुणालाही चाहूल लागू न देता या परिसरात वावरणारा हा वाघ अखेर ट्रॅप कॅमेऱ्यामुळे वनविभागाच्या नजरेस आला आहे. त्यामुळे आता ब्रह्मगाव, देवळाली आणि लगतच्या गावांतील नागरिकांनी घाबरून न जाता अधिक सतर्क राहणे, वनविभागाच्या सूचनांचे पालन करणे आणि वाघाच्या हालचालींबाबत तत्काळ माहिती देणे आवश्यक ठरणार आहे.

# राजनिल राजेश इंगोले राज्यात १२ वा

## प्रमोदजी महाजन स्कूलचे स्कॉलरशिप शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

अंबाजोगाई (प्रतिनिधी) येथील प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या तब्बल ४४ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले. इयत्ता चौथीचा विद्यार्थी राजनिल राजेश इंगोले यांनी राज्य गुणवत्ता यादीत १२ वा क्रमांक पटकावला आहे. यापूर्वीही राजनील राजेश इंगोले याने एमटीएस ऑलंपियाड, ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप एक्झामिनेशन, महाराष्ट्र टॅलेंट सर्च, ज्युनिअर आयए.एस, मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा या स्पर्धा परीक्षांमध्ये दैदीप्यमान यश प्राप्त केले आहे.

इयत्ता पाचवीतून एकूण चौदा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून यामध्ये वेदांत मुळे राज्यात चौदावा तर धीरज लटपटे, कार्तिकी गवळी, स्वराली राजमाने, श्रुती इरलापल्ली, देवाशीष चौधरी, शांभवी शिंदे, सुरेश साकोरे, शौर्य चांदे, श्रीनिवास यादव, श्रेयस आघाव, तनिष्का मुंडे, सुदर्शन भोसलेकर, अनन्या तोळके यांनी यश मिळवले. तसेच, इयत्ता चौथीमधून राजनिल इंगोले राज्यात बारावा तर मथुरा लोमटे, विराज शिंदे, वेदिका कराड, गौरी कदम, अनुज बिरलारे, माऊली चाटे आणि सराज भोसले या आठ विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत यश मिळवले आहे. इयत्ता सातवीमधून प्रसाद वटकरखेडे, प्रसाद शिंदे, पार्थ सवर्णे, काव्या उमपाड, सौमित्र



रामदासी, कार्तिक भुते, नव्यता म्हाजन, दीपक काकटकर, मानसी कपसे, सोहम कामाजी, शहाराश इरलापल्ली, प्रणत देशपांडे, प्रांजल भुते आणि मनोज बल्लाळकर यांनी यश प्राप्त केले. तर इयत्ता आठवीतून सूरजकमल राठोड, पार्थ कदम, साशंक चांदे, साईक शिंदे, शौर्य सोळंके, श्रेया मुंडे, यशराज मस्के आणि विराट शिंदे हे ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मार्गदर्शिका रेखा महाजन, पूनम महाजन - राव, संस्थापक अध्यक्षा मंगला कुलकर्णी, कार्याध्यक्षा कमलाकर कोपले, संस्थापक सचिव शैलेश कुलकर्णी, प्रा.योगेश कुलकर्णी, मुख्याध्यापिका गीतांजली कुलकर्णी यांनी स्वागत केले.

# पावसाने ओढ दिल्याने पिके मान टाकू लागली

## शेतकऱ्यांवर अस्मानी संकट,पिकांचे पंचनामे करून हेक्टरी पन्नास हजार रुपये अनुदान द्या - शिवाजी दादा ठोंबरे

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने सोयाबीन,मुग, उडीद,कापूस यासह इतर पिके सुकण्याच्या मार्गावर असून अनेक ठिकाणी पिकांनी अक्षरशः मान टाकण्यास सुरुवात केली आहे.पावसा अभावी शेतकऱ्यांसमोर खरीप हंगामाचे संकट उभे राहिले असून शेतकरी चिंतेत सापडला आहे. शेतकऱ्यांना दिलासा म्हणून पिकांचे पंचनामे करून हेक्टरी पन्नास हजार रुपये अनुदान देण्याची मागणी छावा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांनी केली आहे.खरीप पिकाला सध्या पाण्याची नितांत गरज असताना पावसानेदडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे.त्यामुळे पिके कोमेजत असून पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.पावसाची प्रतीक्षा करत शेतकरी




आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

पावसा अभावी नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करण्यात यावेत तसेच शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.हेक्टरी पन्नास हजार रुपये अनुदान देण्याची मागणी शिवाजी ठोंबरे यांनी प्रसिध्दीपत्रका द्वारे केली आहे.

# येवता येथील भूमिपुत्र अंकुश सोनवणे यांना इतिहास विषयात पीएचडी पदवी

**वारकरी संप्रदायातील वारीच्या परंपरेवर संशोधन**

केज/प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर च्या मानव विद्या शाखे अंतर्गत इतिहास विषयात अंकुश भागवत सोनवणे यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.त्यांनी 'वारकरी संप्रदायातील वारीची परंपरा : एक अभ्यास' या विषयावर संशोधन केले.या संशोधनासाठी त्यांना लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,परतूर येथील संशोधक मार्गदर्शक डॉ. सखाराम टकले यांचे मार्गदर्शन लाभले. वारकरी संप्रदायातील वारीची ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा यांचा अभ्यास करून सोनवणे यांनी आपले



संशोधन पूर्ण केले. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापरिषद सदस्य डॉ.नरेंद्र काळे,डॉ. राजेश करपे,ड.दत्ता भांगे तसेच इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.हरी जमाले यांच्यासह विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.ग्रामीण भागातून येत इतिहास विषयात पीएचडी पदवी संपादन केल्या बद्दल अंकुश भागवत सोनवणे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बी.फार्मसी महाविद्यालयात जलसंधारण दिनानिमित्त जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी.फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जलसंधारण दिन तसेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व ज्येष्ठ राजकारणी कै.सुधाकरराव राजुसिंग नाईक यांच्या जयंतीनिमित्त जनजागृतीपर कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मंदार चौधरी यांनी उपस्थित मान्यवर, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी जलसंधारण दिन तसेच कै.सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीचे महत्त्व स्पष्ट करून कार्यक्रमाची रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली. यावेळी कै.सुधाकरराव राजुसिंग नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कै.सुधाकरराव नाईक हे ज्येष्ठ भारतीय राजकारणी व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री होते. त्यांचा जन्म २१ ऑगस्ट १९३४ रोजी झाला. ग्रामीण विकास, शेती आणि जलसंधारणाच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजाच्या विकासासाठी तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून जलसंधारणाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाच्या पाण्याचे संधारण, भूजल पुनर्भरण आणि जलस्रोतांचे संरक्षण करण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी कै.सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारण व ग्रामीण विकासाच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजामध्ये जलसंवर्धनाबाबत जनजागृती करावी, असे सांगितले. कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थित विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व कर्मचारी यांनी जलसंधारण दिनाची प्रतिज्ञा घेतली. पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठवणे, भूजल पुनर्भरण करणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचे



संरक्षण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. पाणी वाचवा, जीवन वाचवा हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार उपस्थितांनी केला. सदरील प्रेरक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी यांनी महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व विभागप्रमुख आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांचे कौतुक केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ.संतोष तरके, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे कौतुक करण्यात आले. जलसंधारण दिन आणि कै.सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी, जनजागृतीपर आणि ज्ञानवर्धक ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जबाबदारी आणि ग्रामीण विकास याबाबत जागरूकता निर्माण झाली. राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.सुधाकरराव नाईक यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जलसंपत्तीचे संवर्धन करण्याचा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला. सर्व उपस्थितांनी पाणी वाचवा, जीवन वाचवा या संदेशाचा प्रसार करण्याचा संकल्प केला. यावेळी बी.फार्मसी महाविद्यालयातील डॉ.नरेशकुमार जैस्वाल, डॉ.गीतांजली चव्हाण, काव्या रेड्डी, मंजुषा करेप्पा, इम्रान सय्यद, अश्विनी घोळकर, अमर कावरे, डॉ.विशाल साखरे, सानिका माकोडे, अभिषेक चोले, शितल कराळे, रितीक लखेरा

# ऊस,सोयाबीन,कापूस उत्पादकांच्या हक्कासाठी वज्रमूठ आवळली

**आगामी गळीत हंगामात ऊस दरवाढीसाठी एकजुटीने व्यापक आंदोलनाचा केला निर्धार**

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर क्रांतिकारी शेतकरी संघटना व शेतकरी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.२३ ऑगस्ट रोजी केज येथील कृषी उत्पन्न बाजार समिती च्यासभागृहात व्यापक बैठक पार पडली. बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून आगामीकाळात एकजुटीने आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला.

शेतकऱ्यांची विनाअट सरसकट कर्जमुक्ती, नवीन पीक कर्जाचे वाटप,थकीत पीकविम्याची रक्कम मिळणे,बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना रास्त दर मिळणे,तसेचसोयाबीन व कापूस उत्पादकांच्या विविध प्रश्नांवर बैठकीत चर्चा झाली. साखरेचे दर सध्या ८० रुपयांपर्यंत पोहोचले असून भविष्यात ते १०० रुपयांचा टप्पा पार करण्याची शक्यता आहे.त्यामुळे



आगामी गळीत हंगामात ऊस उत्पादकांना योग्य व वाढीव दर मिळावा, यासाठी एकजुटीने आंदोलन उभारण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.शेत मालाला रास्त भाव मिळावा आणि शेतकऱ्यांच्या हक्कांच्या मागण्या मान्य व्हाव्यात, यासाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आगामी आंदोलनाची दिशा यावेळी निश्चित करण्यात आली. बैठकीत शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट,शेतकरी नेते जगदीश फरताडे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे,लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीस शेतकरी संघटना बीडचे जिल्हाध्यक्ष डॉ. आजिमोद्दिन शेख, गेवराई युवा आघाडी अध्यक्ष रामेश्वर गाडे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे केज तालुकाध्यक्ष दिलीप लोंढे,युवा तालुकाध्यक्ष अतुल गवळी,केज शहराध्यक्ष फेरोजभाई पठाण,धारूरचे अनुरथ काशीद,अंबाजोगाईचे राधाकिशन गडदे, माजलगावचे महादेव गायकवाड,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे शहराध्यक्ष अभिजित लोमटे,वडवणी चे सुमंत गोंडे,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे केज तालुक्यातील सतीश शिंदे,अनंत कोल्हे, सुग्रीव करपे,अशोक अंबाड,गोविंद करपे, दिगंबर मुळे,अड. राजेश शिंदे,सुनील कापरे,मुखीद शेख, यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी,कार्यकर्ते

# सात वर्षाच्या बालिके वर दोघां मित्रांचा अत्याचार,पोक्सो अंतर्गत दोघांविरुद्ध गुन्हा नोंद

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील एका खेडेगावातील दोघां मित्रानी नात्यातीलच ७ वर्षीय बालिकेवर वारंवार अत्याचार केल्या प्रकरणी पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून शुक्रवारी युसूफवडगाव पोलिसात पोक्सो व अत्याच्याराचा गुन्हा नोंद झाला आहे.केज तालुक्यातील एका खेडेगावातील इयत्ता दुसरीच्यावर्गात शिक्षण घेणाऱ्या ६ वर्षे १० महिने २६ दिवस वय असलेल्या लहान बालिकेवर दि.१ मे २०२६ च्या मध्यरात्री पासुन ते दि.१९आगस्ट २०२६ च्या सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान नात्यातीलच दोघां मित्रानी या बालिकेला कसले तरी आमिष दाखवून व तीला घरी बोलावून तीच्या बालमनाचा गैर फायदा घेवून वारंवार तिच्यावर अत्याचार केल्याची फिर्याद पिडीत बालिकेच्या आईने दिल्यावरून युसूफ वडगाव पोलिसात दोघांविरुद्ध शुक्रवारी दि.२१ आगस्ट रोजी दुपारी तीनवाजण्याच्या दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांच्या मार्गदर्शनाखाली पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंद झाला आहे.




दरम्यान अत्याचार करणाऱ्या दोघां मित्राच्या घरच्यांना पीडितेची आई या प्रकरणी विचारपूस करण्यासाठी गेली असता तिलाही लाथा, बुक्क्याने मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

या प्रकरणातील दोघां मित्रांना पिंक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राकेश नेटके यांनी जेरबंद केले असून दोघांपैकी एकाचे वय १९ वर्षे आहे.त्याला केज न्यायालयासमोर हजर केले असता सोमवार पर्यंत त्याला तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश केज न्यायालयाने दिले असून १५ वर्षे वय असलेला आरोपी हा पिंक पथकाच्या ताब्यात असून त्याच्या कडून या प्रकरणाची अधिक माहिती पिंक पथक मिळवीत आहे.

गुन्हा दाखल होताच पिडीत बालिकेची वैद्यकीय तपासणी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात महिला रोगतज्ञ महिला डॉक्टरकडून करण्यात आली आहे.दरम्यान अत्याचार झालेल्या घटनास्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे,पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे,पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उप निरीक्षक राकेश नेटके, फॉरेन्सिक लॅबचे पथक यांनी भेट दिली आहे.

# स्व.विश्वंभर काका कोकिळ यांच्या ९ व्या पुण्यस्मरणार्थ मराठवाडा पातळी वरील भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**लहान गटातून आवनी गिते तर मोठ्या गटातून अरोही धोतरे यांनी सर्वप्रथम**

केज/प्रतिनिधी

वृक्ष लाऊनिया निघूनी जाती,तळी विसावती सानथोर या उक्ती प्रमाणे स्व.विश्वंभर काका कोकिळ हे 'रत्नपारखी'व्यक्तीमत्त्व होते.तसाच वैचारिक दृष्टिकोन,निस्वार्थी कर्तुत्व तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे,सचिव जी.बी. गदळे,सहसचिव उपेंद्र कोकिळ यांच्या प्रति स्व.विश्वंभर काका कोकिळ यांच्या ९ पुण्यतिथी निमित्त आयोजित भव्य वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने मराठवाड्यातील उपस्थित शिक्षक व पालकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.या बाबत सविस्तर माहिती अशी की,जीवन विकास शिक्षण मंडळ,केज तसेच कोकिळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे संस्थापक सचिव स्व. विश्वंभरकाका कोकिळ यांच्या ९ व्या पुण्य स्मरणार्थ मराठवाडा पातळीवरील भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धा केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदीर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि.२२ ऑगस्ट २०२५ वार शनिवार रोजी पार पडली.या स्पर्धेमध्ये लहान गटातून आदर्श प्राथमिक विद्यालय घाटनांदुर या शाळेची आवनी सूर्यकांत गिते तर मोठ्या गटातून जनता माध्यमिक विद्यालय धारूर या शाळेची आरोही बालासाहेब धोतरे या विद्यार्थिनींनी सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुशरावजी इंगळे, अध्यक्ष जीवन विकास शिक्षण मंडळ तथा अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समिती केज तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अनिल महाजन अध्यक्ष ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय तथा पत्रकार दैनिक लोकमत धारूर हे होते इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी.बी.गदळे, सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु.अ.उपेंद्र कोकिळ,संचालक नारायण अंधारे,ज्ञान सागर अकॅडमीचे संचालक प्रा.सिद्धेश्वर वायबसे,सेवानिवृत्त शिक्षक



हनुमंत घाडगे, बाबासाहेब शिनगारे, डॉ.हनुमंत सौदागर प्राचार्य भाऊसाहेब पाटील अध्यापक महा विद्यालय केज,माजी सैनिक तथासाहित्यिक जनार्धन सोनवणे,प्रा. डा.बाबासाहेब हिरवे बाबुराव आडसकर महाविद्यालय केज,प्रा. विठ्ठल समुद्रे वसंत महाविद्यालय केज, क्रांतीसुर्य न्यूजचे संपादक तथा अध्यक्ष हास्य क्लब केजचे विनोदजी शिंदे,अशोक जी सोनवणे,शाळेच्या मु.अ.शिवनंदा मुळे, प्राथमिक शाळेचे मु.अ. वसंत शितोळे,स्व. प्रमोद महाजन महा विद्यालयाचे प्राचार्य शंकर भैरट,स्वयंअर्थ शाळेचे मु.अ.अविनाश कराड आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.मान्यवरांचे स्वागत प्रबोधकांत समुद्रे व शाळेतील विद्यार्थिनी यांनी 'परंपरागत वंदनीय अभ्यागतम सुस्वागतम' हे गीत गाऊन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय जी.बी.गदळे सर यांनी दिला.याप्रसंगी ते म्हणाले,केज व परिसरामध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम विश्वंभर कोकिळ व केशवराव नाळवंडी कर गुरुजी यांनी केले. विश्वंभर कोकिळ यांनी शिक्षण क्षेत्रापासून वंचित राहणाऱ्या मुलांसाठी वस्तीगृहे उभी केली.केज शहर व आसपासच्या परिसरात सर्वोत्कृष्ट शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १९८४ साली जीवन विकास शिक्षण मंडळ केज या संस्थेची स्थापना केली.इ.स. २००० पासून उत्कृष्ट वक्त्यांचे विचार समाजात रुजविण्या साठी व्याख्यानमालेची सुरुवात केली. गणेशोत्सव,आदर्श शिक्षक पुरस्कार, सांस्कृतिक क्षेत्रात देखील योगासन वर्ग, तसेच रक्तदान शिबीराचे आयोजन करून आरोग्या विषयी ची जागरुकता दाखवली.त्यांच्या योगदानामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांचा केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मकही विकास दिसून येतो. दहावी बोर्ड परीक्षेत छत्रपती संभाजीनगर विभागातून २४ विद्यार्थ्यांपैकी या शाळेतील ४ विद्यार्थ्यांनी मिळविले १०० पैकी १०० टक्के गुण मिळविले.याचेश्रेय निश्चितच शाळेतील सर्व शिक्षकवृंदांना जाते.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अनिल महाजन याप्रसंगी बोलताना म्हणाले की, विश्वंभर कोकिळ यांनी सर्वसामान्य ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षण संस्था उभी केली. अर्थात समाजाला खरं घडविण्याचे काम त्यांनी केले,आजच्या संगणक युगामध्ये केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर या स्पर्धेच्या युगामध्ये टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वांगीण प्रगती साधली पाहिजे, अशा स्पर्धेच्या माध्यमा तून देशाचे नेतृत्व घडत असते.अध्यक्षीय समारोपात अंकुशराव इंगळे म्हणाले की, विश्वंभर काका हे केवळ संस्थापकच नव्हे तर आधारस्तंभही होते,आजही विश्वंभर काकांच्या शिस्तीने चालणाऱ्या शाळेसाठी विना-अपेक्षेने कार्य करणारे शिक्षक व त्यांचा त्याग ही कारणे आहेत.अशा होऊन गेलेल्या महान व्यक्ती मत्त्वांच्या कार्याची जाणीव होण्यासाठी असे उपक्रम राबवले जातात.तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हीसंस्था सदैव तत्पर असेल. ही स्पर्धा ५ वी ते ७ वी तसेच ८ वी ते १० वी या दोन गटात पार पडली.या स्पर्धेमध्ये एकूण २७ शाळांनी सहभाग नोंदवला होता.याप्रसंगी लहान गटासाठी परीक्षक म्हणून सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे, बाबासाहेब शिनगारे, माजी सैनिक तथा साहित्यिक जनार्दन सोनवणे यांनी काम पाहिले.तर मोठ्या गटासाठी प्रा.डॉ. हनुमंत सौदागर प्राचार्य भाऊसाहेब पाटील अध्यापकमहाविद्यालय केज,प्रा.डा.बाबासाहेब हिरवे बाबुराव आडसकर महा विद्यालय केज,प्रा. विठ्ठल समुद्रे वसंत महाविद्यालय केज यांनी काम पाहिले.कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण सत्रात शाळे तील सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे यांनी अध्यक्षपद भूषविले.तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक तथा साहित्यिक जनार्दन सोनवणे हे उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना हनुम शैक्षणिक क्षेत्रामध्ये अतिशय महत्त्वाचे योगदान दिले.पुढे त्यांनी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जनार्धन सोनवणे यांनी बोलताना सांगितले की,विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम शिक्षण घेतले पाहिजे.तसेच या स्पर्धेमध्ये टिकून राहायचे असेल तर विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत.सदरील स्पर्धेसाठी उपस्थित परीक्षक म्हणून लाभलेले प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर,प्रा.डॉ. बाबासाहेब हिरवे, सहशिक्षक अमोल गुळवे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना स्पर्धे विषयी बहुमूल्य असे मार्गदर्शन केले.या परीक्षकांनी स्पर्धेच्या शिस्त,परिश्रम व आयोजनाचे कौतुक केले.तसेच केज सारख्या शाळेमध्ये दर्जेदार विद्यार्थी घडतातच कसे हे प्रत्यक्ष आज अनुभवले.स्पर्धेचा निकाल मेघशाम मंगरूळकर यांनी जाहीर केला.पहिला गट इयत्ता ५ वी ते ७ वी-वक्तृत्व स्पर्धेचा विषय कृत्रिम बुद्धिमत्ता - संधी व आव्हाने या स्पर्धेमध्ये लहान गटातून आदर्श प्रा.वि.घाटनांदुर या शाळेची विद्यार्थीनी आवनी सूर्यकांत गिते हिने सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला.तर द्वितीय- आरोही अभिजीत वडगावकर स्वामी विवेकानंद विद्यामंदिर केज,तृतीय - गौरी नवनाथ कांबळे अभिनव पाटील स्कूल, उत्तेजनार्थ- समृद्धी प्रदीप जाधवर खोलेश्वर मा. वि. अंबाजोगाई. दुसरा गट इयत्ता ८ वी ते १० वी वक्तृत्व स्पर्धेचा विषय परीक्षा पेपरफुटी-विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ या स्पर्धेमध्ये मोठ्या गटातून जनता मा.वि. धारूर या शाळेची विद्यार्थीनी आरोही बालासाहेब धोतरे हिने सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. द्वितीय- अर्णव दत्तप्रसादजी सारडा श्री.लक्ष्मेश्वर वि. घाटनांदुर,तृतीय- नंदिनी सुरेश जगताप जयभवानी वि. लोखंडी सावरगाव,

# अवैध गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश, पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांचा सन्मान

## करवीर पोलिसांची धडाकेबाज कारवाई, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्या हस्ते गौरव

कोल्हापूर । प्रतिनिधी

अवैध गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश करून बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायाचे जाळे उघडकीस आणणारे करवीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या उल्लेखनीय तपासाची दखल घेत त्यांचा कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. निलोत्पल यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

करवीर पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने प्रभावी कारवाई करत अवैध गर्भलिंग निदान करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत गर्भलिंग चाचणीच्या माध्यमातून सुरू असलेल्या बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायाचा छडा लागला.

या प्रकरणातील तपासाची दखल जिल्हा गुन्हे परिषदेत घेण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्यासह करवीर पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.अवैध गर्भलिंग निदानासारख्या गंभीर समाजविघातक कृत्यांविरोधात करण्यात आलेली ही कारवाई महिला भ्रूणहत्या रोखण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे. करवीर पोलिसांच्या या प्रभावी तपासाचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध स्तरांतून कौतुक होत आहे.




(सनी लोंढे, सांगली मीडिया)

# बीडमध्ये ३०-३१ ऑगस्टला एसएनडीटी विद्यापीठाचा युवा महोत्सव

## २८ कला प्रकारांमध्ये रंगणार चुरस,मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील महाविद्यालयांचा सहभाग

बीड प्रतिनिधी

एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सव २०२६' यंदा तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे दि. ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे. माननीय कुलगुरू प्रो. डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनाखाली साकारणारा हा भव्य युवा महोत्सव मराठवाड्यात प्रथमच आयोजित होत असून, या ऐतिहासिक सोहळ्याच्या यजमानपदाचा मान बीडला मिळाला आहे.या दोन दिवसीय महोत्सवात मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न जवळपास १०० महाविद्यालयांमधील विद्यार्थिनी-कलाकार सहभागी होणार आहेत. विद्यार्थिनींच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या महोत्सवात भव्य शोभायात्रेसह संगीत, नृत्य, साहित्य, नाट्य आणि ललित कला अशा विविध क्षेत्रांतील २८ कलाप्रकारांच्या स्पर्धा रंगणार आहेत.

महोत्सवाचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता रामकृष्ण लॉन्स येथे होणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख प्रो. डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थान भूषवतील. यावेळी विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. नितीन एस. प्रभुतेंडोलकर, प्रमुख पाहुणे प्रा. सुनील मगरे, डॉ. साईनाथ बनसोडे तसेच प्रा. प्रदीप रोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये विजयी ठरणाऱ्या विद्यार्थिनींना प्रसिद्ध अभिनेते व विनोदी कलाकार गौरव मोरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा या लोकप्रिय कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेल्या गौरव मोरे यांच्या उपस्थितीमुळे महोत्सवाला सांस्कृतिक वैभवाबरोबरच मनोरंजनाचीही विशेष रंगत लाभणार आहे.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे तसेच सांस्कृतिक प्रमुख व कार्यक्रमाच्या संयोजक प्रा.विद्या आवघाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी विशेष परिश्रम घेत आहेत. महोत्सवासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, सहभागी विद्यार्थिनींच्या स्वागतापासून ते स्पर्धांचे नियोजन, निवास, भोजन आणि इतर व्यवस्थांची जय्यत तयारी करण्यात येत आहे.

# लातूर येथे २४ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

लातूर (जिमाका)

उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गुंतवणूकदार व व्यवसायिकांची जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजन करण्यात आले आहे. जुनी एमआयडीसी येथील इनराइज बाय सयाजी हॉटेल येथे ही परिषद होणार आहे.

जिल्हातील गुंतवणूक वाढवणे व नव उद्योजकांना आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, लातूर जिल्हा विकासासाठी केंद्र बिंदू मानून जिल्ह्याच्या व राज्याच्या विकासाला चालना देणे हा जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचा उद्देश आहे.

जिल्ह्यातील गुंतवणूक वाढविण्यासाठी जिल्ह्यातील नवउद्योजकांसोबत व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये सामंजस्य करार करुन, नव उद्योजकांना एमओयु वितरीत करण्यात येणार आहेत. तरी जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक उद्योजक, व्यावसायिक यांना जिल्हा गुंतवणूक परिषदेला उपस्थित रहावे, असे आवाहन लातूरचे सहायक आयुक्त (उद्योग व सेवा) निखिल पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक उद्योग अधिकारी (मो.क्र. ७३९७८३०५८८) यांच्याशी संपर्क साधावा.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रक (एल.पी.) वर स्थानिक गुन्हे शाखा

# बीडची कारवाई कारवाईमध्ये ३५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, दोघांविरुद्ध पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा दाखल



बीड प्रतिनिधी

दि. २३.०८.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशानुसार पोउपनि शेखर औटे सोबत पोअं/२२१५ मनोज परजणे, पोअं/२३१० बबन सलगर, पोअं/२२१० अश्पाक सय्यद यांचे पथक गेवराई परिसरात अवैध धंदेवर कारवाई करणेकामी पेट्रोलिंग करीत असताना धुळे-सोलापूर महामार्गावरील हॉटेल डिसेंटसमोर एक ट्रक (एल.पी.) विनापरवाना वाळू भरून अवैध वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने पंचांसमक्ष पहाटे सुमारे ०२.३० वाजता छापा टाकून अशोक लेलैंड कंपनीचा केशरी रंगाचा ट्रक (एल.पी.) क्रमांक चक-२६-इए-०११५ ताब्यात घेतला. ट्रकमध्ये अंदाजे १५ ब्रास वाळू आढळून आली. वाळू वाहतुकीचा आवश्यक परवाना/पास नसल्याचे वाहनातील इसमांनी सांगितले.

कारवाई दरम्यान आरोपी जितेंद्र राजेंद्र नेमाणे (वय २३ वर्षे) व गणेश राजेंद्र नेमाणे (वय २४ वर्षे), दोघे रा. नारायणगाव, ता. अंबड, जि. जालना यांना ताब्यात घेण्यात आले. जप्त मुद्देमालामध्ये अशोक लेलैंड ट्रक (एल.पी.) व अंदाजे १५ ब्रास वाळू, असा एकूण ३५,९०,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर कारवाईबाबत संबंधितांविरुद्ध पोलीस ठाणे गेवराई गुरनं ५०३/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर तपास सुरू आहे.

सदरील कामगिरी श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री अनिल कटके, उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोअं/२२१५ मनोज परजणे, पोअं/२३१० बबन सलगर, पोअं/२२१० अश्पाक सय्यद सर्व नेमणुक स्था. गु.शा यांनी केली आहे.

# तीन वर्षीय चिमुकलीवर अचानक भटक्या कुत्र्याने हल्ला केला

बीड(प्रतिनिधी)बीड शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून चिमुकली, विद्यार्थी आणि नागरिकांवर कुत्र्यांकडून हल्ल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. मात्र, या गंभीर समस्येकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील धांडे नगर परिसरातील शिवतेज नगर येथे गुरुवारी (दि. २० ऑगस्ट) सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास घरासमोर खेळत असलेल्या तीन वर्षीय शिवांशी रामेश्वर घोलप या चिमुकलीवर अचानक भटक्या कुत्र्याने हल्ला केला शेजारील नागरिकांनी तात्काळ कुत्र्याला हुसकून लावल्याने पुढील अनर्थ टळला परंतु या हल्ल्यात चिमुकलीच्या तोंडाला गंभीर दुखापत झाली असून तिच्या चेहऱ्यावर तब्बल १२ टाके पडले आहेत. तिच्यावर नगर नाका परिसरातील जनाई हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.



या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुले घराबाहेर खेळण्यासाठी गेल्यानंतर भटक्या कुत्र्याच्या हल्ल्याची भीती पालकांना सतावत आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने केवळ कागदोपत्री उपाययोजना न करता शहरातील भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# गेवराईत पैगंबर जयंतीनिमित्त मशिदींमध्ये दुरूदची मैफिल

अहेले-ऐ-सुन्नत जमातचे उलमा आणि समाज बांधवांची मोठी उपस्थिती

गेवराई(जिल्हा प्रतिनिधी शेख जावेद सर):-हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त (ईद-ए-मिलादुन्नबी) गेवराई शहरात ठिक ठिकाणी मशिदीं मध्ये अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात 'दुरूदच्या मैफिलींचे' आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमांना अहेले-ऐ-सुन्नत वल जमातचे उलमा (धर्मगुरू) आणि मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.पैगंबर जयंतीचे औचित्य साधून शहरातील मुख्य मशिदींना आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुराणचे पठण (तिलावत-ए-कुराण) ने झाली. या नंतर पैगंबर मोहम्मद यांच्यावर दुरूद आणि सलाम (प्रार्थना) पाठवण्यात आले. संपूर्ण मशिदींचा परिसर 'दुरूद आणि नात'च्या सुरांनी दुमदुमून गेला होता.या प्रसंगी उपस्थित अहेले-ऐ-सुन्नत वल जमातच्या उलमांनी मोहम्मद पैगंबर यांच्या जीवनचरित्रावर (सीरत) प्रकाश टाकला.




पैगंबरांनी दिलेला शांतता, मानवता, बंधुभाव आणि गरिबांना मदत करण्याचा संदेश प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आचरणात आणला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर गेवराई शहर, महाराष्ट्र राज्य आणि देशात सुख, शांती, समृद्धी नांदो या साठी विशेष सामूहिक प्रार्थना (दुआ) करण्यात आली. या कार्यक्रमाला शहरातील अबालवृद्धांसह मुस्लिम बांधवांची लक्षणीय गर्दी होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मशिदींचे ट्रस्टी, अहेले-ऐ-सुन्नत वल जमातचे पदाधिकारी आणि स्थानिक तरुणांनी परिश्रम घेतले.

# बिंदुसरा बंधाऱ्यामुळे बीडचा 'ड्राय झोन' होणार पाणीदार

बीड (प्रतिनिधी):- शहराला होणारा विलंबाचा पाणीपुरवठा आणि पावसाची ओढ यामुळे माजलगाव धरणात सध्या अवघा २२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर येत्या काळात बीड शहराला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. परतीचा पाऊस झाल्यास ते पाणी नदीमार्गे वाहून जाऊ नये, यासाठी आमदार संदीप क्षीरसागर सतर्क झाले आहेत. शहरातील बार्शी नाका येथे सुरू असलेल्या पूल कम बंधार्याच्या कामाला गती देऊन ऑक्टोबर मध्ये परतीच्या पावसात पाणी अडलेच पाहीजे, अशा हिशोबाने कामाची गती वाढविण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधितांना दिल्या आहेत.



शनिवारी (दि. २२) रोजी आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी बिंदुसरा नदीवर सुरू असलेल्या 'पूलकम बंधारा' कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पूल कम बंधार्याच्या माध्यमातून बीड शहरातील ५ कि.मी.च्या परिघात भूजल पातळीत मोठी वाढ होणार असल्याने आ.क्षीरसागर यांनी कंत्राटदार आणि संबंधित अभियंत्यांना येत्या ऑक्टोबर महिन्यात कोणत्याही परिस्थितीत पाणी अडवलेच पाहिजे, अशा सक्त सूचना दिल्या आहेत.

शहराची गरज ओळखून प्लॅन मध्ये अंशतः बदल

आ. संदीप क्षीरसागर यांनी सातत्याने प्रयत्न करीत हा पूलकम बंधारा मंजूर करून आणला त्याचे काम प्रगतीपथावर आहे. दरम्यान बंधार्याच्या अगोदरच्या प्लॅनमुळे पाणी साठवणूक कमी होत असल्याचे लक्षात येताच आ. संदीप क्षीरसागर यांनी पुन्हा बंधाऱ्याचा प्लॅन बदलून घेतला आहे. यामुळे आता पाणी साठवणूकीत लक्षणीय वाढ होणार आहे आणि परिणामी बंधार्याच्या ५ कि.मी. च्या परिघात भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. त्यामुळे पाण्याच्या बाबतीत बीड शहराला मोठा फायदा होणार आहे.

# डॉ. संतोष मुंडे यांच्या हस्ते १६ दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के दिव्यांग निधीचे वाटप

## दौनापूर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना आर्थिक मदतीचा हात

परळी ।प्रतिनिधी

दौनापूर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ५ टक्के दिव्यांग निधीतून गावातील १६ दिव्यांग बांधवांना महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण अभियान मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या हस्ते प्रत्येकी १००० रुपयाच्या निधीचे वाटप करण्यात आले या प्रसंगी दौनापूर ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. राजाभाऊ आघाव, युवानेते सचिन गित्ते, संतोष आघाव तसेच ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री आ.धनंजय मुंडे , मा.ना.पंकजाताई मुंडे व दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे मंत्री ना.अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांच्या कल्याणासाठी प्रत्येक क्षणी प्रथम प्राधान्याने प्रयत्न करणारे तसेच शासनाच्या कोणत्याही योजनेतून एकही दिव्यांग वंचित राहू नये यासाठी अविरत प्रयत्न करणारे दिव्यांग कल्याण अभियान मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी अखंड महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासाचा वसा घेतला आहे त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणजे हे ५ टक्के दिव्यांग निधीचे वाटप.

अशा या निधी वाटपाची रक्कम खालील लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर ठढत्रऋ द्वारे थेट जमा करण्यात आली आहे ज्या मध्ये १.घाडगे हरिभाऊ साधू २.संतोष गणपत आघाव३.दत्तू संभाजी मन्नाडे ४.गौतम गंगाराम घाडगे ५.संतोष शिवाजी आघाव ६.मारोती मनोहर आघव ७. सुदाम बाजीराव मुळे ८.शिवहारी महादेव आघाव ९. नामदेव पंडितराव आघाव १०. चंद्रकांत शेषेराव जाधव ११. इंद्रावणी लिंबाजी राख १२.घाडगे अमृता रानबा १३. सिद्धी संतोष आघाव १४. सुधाकर मारुती घाडगे १५. अक्षय ज्ञानोबा मुळे १६.महेश अंकुश आघाव यांचा समावेश आहे.



दरम्यान दिव्यांग बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी दौनापुर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे डॉ संतोष मुंडे यांनी अभिनंदन केले व तालुक्यातील बाकीच्या सर्व ग्रामपंचायतींनी दौनापुर ग्रामपंचायतीचा आदर्श घ्यावा असे आव्हान केले.तसेच दिव्यांग बांधवांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.दिव्यांगांच्या सर्वांगीण कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या अशा विविध उपक्रमांचे व योजनांचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.




# बलभीम महाविद्यालयास आंतर महाविद्यालयीन स्विमिंग क्रीडा स्पर्धेत पाच पदके

बीड ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व राजश्री शाहू महाविद्यालय पाथरी यांच्या संयुक्त विद्यमानाने अंतर महाविद्यालयीन स्विमिंग क्रीडा स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धा २० ऑगस्ट २०२६ रोजी संभाजीनगर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये बलभीम महाविद्यालयाच्या खेळाडूंनी एकूण पाच पदकांची कमाई केली.

यामध्ये कुंडरे अजय नारायण याने १०० मीटर फ्रीस्टाइल या प्रकारामध्ये ब्रॉझ पदक प्राप्त केले. तसेच गरजे यश भागवत याने १०० व २०० मी. बॅकस्ट्रोक या क्रीडा प्रकारामध्ये अनुक्रमे सिल्वर व ब्रॉज पदक प्राप्त केले यासोबतच घेणे सुदर्शन बालाजी याने २०० व १०० मीटर बॅक स्ट्रोक या क्रीडा प्रकारात गोल्ड व सिल्वर पदक प्राप्त केले.

खेळाडूंच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आय.क्यु.ए.सी.समन्वयक डॉ. अनिल चिंधे, प्रबंधक पी.पी.डावकर, कार्यालय अधीक्षक किसन सागडे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. जे.जी.तत्तापूरे, डॉ. संदीप परदेशी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

या खेळाडूंना क्रीडा विभागप्रमुख डॉ. जे. जी. तत्तापुरे, डॉ. संतोष घोरपडे व डॉ रानी पवार यांनी मार्गदर्शन केले.





# भारतीय बौद्ध महासभेची आष्टीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील बुद्धविहार येथे भारतीय बौद्ध महासभेची राज्याच्या आदेशानुसार महत्त्वपूर्ण बैठक रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी संपन्न झाली. या बैठकीत भारतीय बौद्ध महासभेच्या आगामी कार्याची दिशा, संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येणारे विविध उपक्रम, धम्मकार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन तसेच बुद्ध-धम्माचा विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याबाबत सविस्तर चर्चा व विचारविनिमय करण्यात आला. संघटनेच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देऊन समाजप्रबोधनाच्या माध्यमातून समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक एकोपा मजबूत करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित या बैठकीमध्ये संघटनेच्या आगामी उपक्रमांबाबत पदाधिकारी व धम्म उपासकांनी आपली मते मांडली. बदलत्या सामाजिक परिस्थितीत बुद्ध-धम्माच्या विचारांची समाजाला अधिक गरज असून, हा विचार केवळ काही घटकांपुरता मर्यादित न राहता समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याची आवश्यकता यावेळी व्यक्त करण्यात आली. धम्मकार्याच्या माध्यमातून समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण करणे, युवक व विद्यार्थ्यांना बुद्ध-धम्माच्या विचारांशी जोडणे तसेच सामाजिक प्रबोधनाच्या विविध उपक्रमांना चालना देणे याबाबत बैठकीत चर्चा झाली.

आष्टी तालुक्यात भारतीय बौद्ध महासभेचे संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने गावपातळीवर कार्यकर्त्यांचा सहभाग वाढविणे, धम्म उपासकांना संघटित करणे आणि विविध धम्मविषयक कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे यावरही बैठकीत भर देण्यात आला. बुद्ध-धम्माचा मूलभूत संदेश समाजातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविताना समता, स्वातंत्र्य, बंधुता, विवेक, मानवता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने कार्य करण्याची गरज उपस्थितांनी व्यक्त केली.

समाजातील नव्या पिढीला बुद्ध-धम्माच्या विचारांची ओळख करून देणे, युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे आणि धम्मकार्याशी त्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे याबाबतही विचारमंथन करण्यात आले. तसेच महिला, युवक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक घटकांना संघटनेच्या कार्याशी जोडून घेण्यासाठी आगामी काळात नियोजनबद्ध पद्धतीने उपक्रम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. धम्मकार्याबरोबरच सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढविण्यासाठी संघटनेने पुढाकार घेण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली.

बैठकीस भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हाध्यक्ष महालिंगदादा निकाळजे, वामनबाप्पू निकाळजे, आष्टी तालुकाध्यक्ष रत्नाकांत निकाळजे सर, प्रा. ओव्हाळ सर, सुरेश निकाळजे, अशोक निकाळजे, संदिप जाधव, बबनराव शिंदे, प्रविण खेत्रे, शहादेव कांबळे, अतुल जाधव यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व धम्म उपासक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संघटनेच्या आगामी कार्याबाबत मार्गदर्शन करत धम्मकार्य अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

# बांधकाम क्षेत्रातील अनुभवाला ई-टेंडरिंग सेवेची जोड-आ.सुरेश धस

## आष्टीत अभियंता अवित घोलप यांच्या 'आयकॉन इंजिनिअर्स अँड ई-टेंडरिंग सर्व्हिसेस'चा भव्य शुभारंभ

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) अभियंता अवित घोलप यांच्या 'आयकॉन इंजिनिअर्स अँड ई-टेंडरिंग सर्व्हिसेस' या नव्या व्यवसायाचा भव्य शुभारंभ रविवारी आमदार सुरेश धस यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. बांधकाम क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्याला आता ई-टेंडरिंग सेवेची जोड मिळाल्याने अभियंता अवित घोलप यांच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होणार असून, या माध्यमातून त्यांनी नवी ओळख निर्माण करावी, अशा शुभेच्छा यावेळी आ. सुरेश धस यांनी दिल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. सुरेश धस म्हणाले की, अभियंता अवित घोलप यांनी अहिल्यानगर येथे व्यवसायाची सुरुवात करून बांधकाम क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तांत्रिक ज्ञानासोबतच कल्पकता, कौशल्य, नियोजन आणि दर्जेदार कामाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सुंदर व मजबूत वास्तू उभारल्या आहेत. बांधकाम करणे म्हणजे केवळ विटा, सिमेंट आणि लोखंड एकत्र करणे नव्हे, तर त्यामागे योग्य नियोजन, तांत्रिक ज्ञान, सुरक्षितता, गुणवत्तेची जाणीव आणि कल्पकता आवश्यक असते. या सर्व बाबींचा योग्य समन्वय अभियंता अवित घोलप यांच्या कामातून दिसून येतो, असे त्यांनी सांगितले.





केंद्र व राज्य शासनाच्या विविध घरकुल योजनांमुळे सर्वसामान्य कुटुंबांना स्वतःचे घर उभारण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागासह सर्वच ठिकाणी बांधकाम क्षेत्राला मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. या संधींचा तांत्रिकदृष्ट्या योग्य आणि पारदर्शक पद्धतीने उपयोग करून घेणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत ई-टेंडरिंगच्या माध्यमातून विविध शासकीय व निमशासकीय विकासकामांशी संबंधित सेवा उपलब्ध करून देण्याचा अभियंता अवित घोलप यांचा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास आ. धस यांनी व्यक्त केला.

अभियांत्रिकी क्षेत्राच्या योगदानाचा गौरव करताना आ. सुरेश धस यांनी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. देशाच्या विकासात अभियंत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, आधुनिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीत तांत्रिक कौशल्याला मोठे महत्त्व आहे. अभियंता अवित घोलप यांनीही आपल्या कौशल्याचा उपयोग व्यापक विकासकामांसाठी करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अवित घोलप यांनी आतापर्यंत घरांच्या बांधकाम क्षेत्रात आपल्या गुणवत्तापूर्ण कामाची स्वतंत्र छाप निर्माण केली आहे. आता आयकॉन इंजिनिअर्स अँड ई-टेंडरिंग सर्व्हिसेसच्या माध्यमातून ई-टेंडरिंग क्षेत्रातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण करावी. भविष्यात पूल, बॅरेजेस, रस्ते तसेच विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये त्यांच्या अभियांत्रिकी कौशल्याचा ठसा उमटावा, अशी अपेक्षाही आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली.

नव्या व्यवसायाच्या माध्यमातून ग्राहकांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम, पारदर्शक, विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवा मिळावी, तसेच अभियंता अवित घोलप यांच्या व्यवसायाला उत्तरोत्तर यश, प्रगती आणि नावलौकिक मिळावा, अशा शुभेच्छा उपस्थित मान्यवरांनी दिल्या.

या शुभारंभ सोहळ्यास ह.भ.प. शिवाजी महाराज कोकणे, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मधुकर हंबर्डे, ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे, सभापती बद्रीनाथ जगताप, भाजपचे विधानसभा अध्यक्ष गणेश शिंदे, सरपंच राधेश्याम धस, उद्योजक अशोक मुटकुळे, प्राचार्य सोपान निंबोरे, महादेव नाना शिंदे, संजय गाढवे, पांढरीचे सरपंच सुधीर पठाडे, पत्रकार अविनाश कदम, युवा उद्योजक प्रेमकुमार तावरे, रिजवान शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, व्यावसायिक आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रप्रमुख हरिष हातवटे यांनी केले, तर अभियंता अवित घोलप यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्रावण मासासाठी हिमायतनगर पोलिसांचा चोख बंदोबस्त

हिमायतनगर : श्रावण मासाच्या पार्श्वभूमीवर शहर व परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हिमायतनगर पोलीस प्रशासनाने विशेष बंदोबस्ताची तयारी केली आहे. पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस फौजफाटा तैनात ठेवण्यात आला आहे.श्रावण महिन्यात मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने तसेच विविध धार्मिक कार्यक्रम व मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. यासाठी २९ होमगार्ड, ५ महिला होमगार्ड, ४ एपीआय अधिकारी आणि ४० पोलीस कर्मचारी असा पोलीस




फौजफाटा बंदोबस्तासाठी सज्ज ठेवण्यात आला आहे.

धार्मिक स्थळे, गर्दीची ठिकाणे, प्रमुख चौक तसेच संवेदनशील भागांमध्ये पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.श्रावण मासातील सर्व धार्मिक कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडावेत, यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या असून कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# परभणी येथे ब्राह्मण समाज संवाद यात्रा मेळावा घेण्यात आला

अंबाजोगाई - प्रतिनिधी :--

दि २२ ऑगस्ट रोजी परभणी येथे सरदेशपांडे हुर्डा पार्टी टुरिरिझम मध्ये ब्राह्मण समाज संवाद यात्रा मेळावा घेण्यात आला.या प्रसंगी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे आद्यक्ष कॅप्टन आशिष दामलेजी ,विश्वजित देशपांडे, निखिल लातुरकर,सचीन वाडेपाटील,सुरेश मुळे,मकरंद कुलकर्णी, संजय सुपेकर, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला,

यासाठी विविध ब्राह्मण संघटना एकत्र आल्या होत्या.

सर्वच संघटने अध्यक्ष, पदाधिकारी यांनी या मध्ये सहभाग घेतला,बंडूनाना सराफ,मनोज जोशी,दिलीपदादा जोशी,अभय जोशी,आणि सर्वच पदाधिकारी यांची उपस्थिती होती. या मेळाव्याचे आयोजन योगेश जोशी,नंदकुमार परांडडकर,दिपक कासंडे,सरदेशपांडे, विठू गुरू यांच्या पुढाकाराने हा मेळावा घेण्यात आला




# आपले सरकार सेवा केंद्रांना स्मार्ट लुक देण्यासाठी जिल्हा प्रशासन सरसावले

## (आपले सरकार सेवा केंद्रांची जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी; नियमबाह्य केंद्रावर तात्काळ कारवाई - जिल्हाधिकारी नांदेड)

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांनी शासन निर्णयानुसार निर्धारित गुणवत्ता, मानांकन व सन्मान कार्यपद्धतीचे मुदतीत पालन करणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी नांदेड राहुल कर्डिले यांनी आज दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रत्यक्ष दोन आपले सरकार सेवा केंद्रांना भेट देऊन केंद्रांची सखोल पाहणी केली. पाहणीदरम्यान शासनाच्या निकषांचे पालन न करणार्या केंद्रावर कार्यवाही करण्यात आली, त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये स्पष्ट संदेश गेला आहे.

या पाहणीमध्ये शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या जागेत सुरू आहे काय, केंद्राचे आतील व बाहेरील बॅनर, उपलब्ध सेवा व दरसूची, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, संगणक संच, प्रिंटर, णझड, वेब कॅमेरा, नागरीकांना सभ्यतेची वागणुक, केंद्राच्या खोलीची आवश्यक आकारमानाची पूर्तता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अर्जदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच संगणक प्रणालीमध्ये अर्जदारांची कागदपत्रे व छायाचित्रांची माहिती सुरक्षित पद्धतीने जतन करणे बाबत पडताळणी करण्यात आली.

तसेच जिल्हाधिकारी यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर उपस्थित अर्जदारांशी सेवा बाबत प्रत्यक्ष संवाद साधून शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा पावतीशिवाय अथवा अतिरिक्त रक्कम आकारली जाते काय, याची चौकशी केली. अर्जदारांना प्रमाणपत्रानुसार तात्काळ पावती दिली जाते काय, तसेच ऑनलाईन पावतीमध्ये नमूद असलेल्या शुल्कानुसारच रक्कम स्वीकारली जाते काय, याचीही प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. अर्जदारांनी सर्व सेवाकरीता केंद्रचालकाकडुन रितसर पावती घ्यावी.

आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या विविध सेवा पारदर्शक, सुलभ व नियमानुसार उपलब्ध करून देणे हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे सर्व केंद्रचालकांनी शासन निर्णयातील सर्व निकषांची काटेकोरपणे पूर्तता करून केंद्रे नियमितपणे सुरू ठेवावीत. नियमांचे उल्लंघन, अनधिकृत शुल्क आकारणी, अपुऱ्या सुविधा किंवा केंद्र बंद ठेवणे आढळल्यास संबंधित केंद्रावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट संदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या पाहणीमधून दिला आहे.

या अनुषंगाने निवासी उप जिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी सर्व आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी नियमानुसार काम करावे,अन्यथा कठोर कारवाई स सामोरे जावे लागेल असा इशारा दिला आहे.

या पाहणीवेळी उपविभागीय अधिकारी नांदेड डॉ. सचिन खल्लाळ, नायब तहसीलदार सुनील माचेवाड, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक नीरज धामणगावे आदी उपस्थित होते.

